दैनिक

# सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३०५ | किंमत : २ रूपये



कूष्मांडा देवी

Hotel Mai VilLa

Ac/Non Ac Room Available

Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur

- Contact No -

7796116694

9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६

# गंगेत नाव उलटून १३ ठार

## अंत्यसंस्काराच्या जेवणाला जात होते, बिहारमधील हाजीपूर येथील घटना

**वृत्तसंस्था, बिहार**

बिहारमधील हाजीपूर येथे गंगा नदीत ३५ ते ४० प्रवाशांना घेऊन जाणारी नाव उलटल्याने मोठा अपघात झाला. या घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये लहान मुलांची संख्या अधिक आहे.



बिहारमधील वैशाली जिल्ह्यातील हाजीपूर येथे मंगळवारी (१३ ऑक्टोबर) संध्याकाळी एक अत्यंत वेदनादायक आणि हृदयद्रावक दुर्घटना घडली. राघोपूरमधील रामपूर गावात गंगा नदीत ३५ ते ४० प्रवाशांना घेऊन जाणारी नाव अचानक नदीच्या पात्रात उलटली. या अपघातात तब्बल १३ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून मृतांमध्ये लहान मुलांचे प्रमाण जास्त आहे. हे सर्व नागरिक एका अंत्यसंस्काराचे जेवण जेवण्यासाठी जात असताना हा अपघात घडला.

नाव अचानक कशी उलटली याचे अचूक कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही घटना विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांच्या राघोपूर मतदारसंघात घडली आहे.

**अनेक जण पोहून आले बाहेर**

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने नदीत धाव घेऊन पाण्यात बुडणाऱ्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू केले. जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणा तात्काळ सतर्क झाली असून एनडीआरएफच्या पथकाला पाचारण करण्यात आले. अपघातात जखमी झालेल्यांना रुग्णवाहिकेच्या साहाय्याने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, नाव उलटल्यानंतर काही जणांनी हिमतीने पोहून नदीकाठ गाठला आणि आपला जीव वाचवला. प्रशासनाकडून अद्याप अधिकृत मृत्यूच्या आकड्याची पुष्टी केली जात नसून शोधमोहीम अजूनही सुरू आहे.

या भीषण अपघातावर विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, "राघोपूर दियारा भागात नाव उलटल्याची अत्यंत दुर्दैवी आणि दुःखद बातमी मिळाली. बुडणाऱ्यांमध्ये बहुतांश लहान मुले आहेत.

ईश्वर सर्वांना सुरक्षित ठेवू दे. स्थानिक नागरिक, प्रशासन आणि अधिकाऱ्यांशी बोलून मदत, बचाव व उपचाराच्या कामाला वेग देण्याचे निर्देश दिले आहेत."याशिवाय बिहार काँग्रेस आणि आरएलएम प्रमुख उपेंद्र कुशवाह यांनीदेखील या घटनेवर शोक व्यक्त करत मृत बालकांना श्रद्धांजली वाहिली आहे आणि शोकाकुल कुटुंबांप्रति तीव्र संवेदना व्यक्त केल्या आहेत.

## थोडक्यात

### दहशतवाद्यांचा अड्डा सापडला

**पूंछ :** जम्मू आणि कश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील सुरक्षा दलांकडून दहशतवाद्यांच्या शोधासाठी शोध मोहिम सुरू आहे. या मोहिमेदरम्यान सुरक्षा दलांना दहशतवाद्यांचा अड्डा सापडला. या अड्ड्यातून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त केला आहे. या जागेचा वापर दहशतवादी शस्त्रे आणि इतर साहित्य लपवण्यासाठी केला जात होता. या ठिकाणाहून सुरक्ष दलाने एके-४७ रायफल, ३० काडतुसे, सहा ग्रेनेड, बँडेज, बॅटरी, एक टॉर्च आणि वैद्यकीय साहित्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू जप्त केल्या आहेत. शोध मोहिमेदरम्यान सुरक्षा दलाला सुरानकोटच्या सजवान सेक्टरमधील साथरबन परिसरात एक गुहा सापडली. या गुहेचा वापर शस्त्रे आणि इतर वस्तू लपवण्यासाठी केला जात होता. गुहेची झडती घेतली असता आत शस्त्रे आणि दारुगोळा आढळला. यासह पुरी, चणे आणि सुका मेवा देखील सापडला. गुहेत आढळलेले ग्रेनेड बॉम्ब निकामी करणाऱ्या पथकाने नष्ट केले. सुरक्षा दलांकडून परिसरात शोधमोहीम सुरू आहे.

### सामाजिक कार्यकर्त्याची गोळ्या झाडून हत्या

**मानसा :** पंजाबच्या मानसा जिल्ह्यात एक अत्यंत खळबळजनक घटना समोर आली असून येथे अमली पदार्थांच्या(ड्रग्ज) अवैध विक्रीविरोधात लढा देणारे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते परविंदर सिंग झोटा यांची एका मेडिकल स्टोअर चालकाने गोळ्या घालून हत्या केली आहे. ही संपूर्ण घटना परविंदर सिंग यांच्या फेसबुक लाईव्ह दरम्यान कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या धक्कादायक घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे.

# आठव्या वेतन आयोगानुसार लेवल १० च्या कर्मचाऱ्यांची लॉटरी

**वृत्तसंस्था, मुंबई**

केंद्र सरकारने गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात ८ व्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मंजुरी दिली होती. तेव्हापासून या आयोगाच्या सातत्याने बैठका सुरू आहेत. या बैठकांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन आयोग आणि सरकारकडून असलेल्या अपेक्षांवर सविस्तर चर्चा केली जात आहे. याशिवाय कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ करण्याबाबत विविध सूचनाही दिल्या जात आहेत. याच दरम्यान कर्मचारी संघटनांनी दरवर्षी मिळणाऱ्या वार्षिक पगारवाढीचा दर ३ % वरून थेट ५ % ते ७ % पर्यंत वाढवण्याची आक्रमक मागणी केली आहे.

एका इंग्रजी वृत्तपत्राच्या अहवालानुसार, जर वार्षिक पगारात ७ % दराने वाढ झाली, तर काही विशिष्ट पे लेव्हलवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १० वर्षांत सध्याच्या ३% वाढीच्या तुलनेत लाखो रुपये अधिक मूळ वेतन मिळू शकते.

गणितानुसार, एवढी वेतनवाढ झाल्यास लेव्हल-१०च्या कर्मचाऱ्यांना १० वर्षांच्या कालावधीत सुमारे ३४ लाख रुपयांचे अतिरिक्त बेसिक सॅलरीचे उत्पन्न मिळू शकते. दरवर्षी मिळणारी ३% पगारवाढ ही महागाई आणि वाढत्या खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे, त्यामुळे ती वाढवून मिळावी, असे कर्मचारी संघटनांचे म्हणणे आहे.

अहवालात २.१५ फिटमेंट फैक्टर गृहीत धरून हा अंदाज बांधण्यात आला आहे. जर वार्षिक इंक्रीमेंट ३% वरून ४% किंवा ७% पर्यंत वाढवले, तर कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात किती मोठा फरक पडू शकतो, याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

या अहवालात पुढे नमूद करण्यात आले आहे की, वेगवेगळ्या कर्मचारी संघटनांनी वार्षिक इंक्रीमेंट वाढवण्यासाठी वेगवेगळ्या दरांचे पुरावे व सूचना दिल्या आहेत. नॅशनल कौन्सिल ऑफ जॉइंट कन्सल्टेटिव्ह मशिनरी, ऑल इंडिया डिफेन्स एम्प्लॉईज फेडरेशन आणि फेडरेशन ऑफ नॅशनल पोस्टल ऑर्गनायझेशन्स यांनी ६% वाढीची सूचना केली आहे. तर दुसरीकडे, ऑल इंडिया न्यू पेन्शन स्कीम एम्प्लॉईज फेडरेशनने ७% वार्षिक इंक्रीमेंटची मागणी लावून धरली आहे. दरम्यान, सध्या सर्व कर्मचारी ८ व्या वेतन आयोगाच्या अधिकृत शिफारशींची वाट पाहत आहेत. जून २०२७ पर्यंत हा अहवाल येण्याची शक्यता वर्तवली जात असून, त्यानंतरच कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष वेतनवाढीचा मार्ग मोकळा होणार आहे. सध्या आयोगाने फिटमेंट फॅक्टर आणि इतर भत्त्यांबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.

# नितीश कुमार यांचा जेडीयू पक्ष भाजपमध्ये विलीन होणार?

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

बिहारमध्ये एनडीए सरकार भक्कम बहुमताने कार्यरत असले तरी मुख्यमंत्रिपदावरून नितीश कुमार बाजूला झाल्यापासून जेडीयूच्या भवितव्याबाबत राजकीय वतुर्ळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे. त्यातच नवी दिल्लीतील भाजप मुख्यालयात केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जेडीयूचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री ललन सिंहव्यासपीठावर उपस्थित राहिल्याने बिहारच्या राजकारणात मोठा गदारोळ माजला आहे.



या घटनेनंतर राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसने जेडीयूवर जोरदार निशाणा साधत, जेडीयू लवकरच भाजपमध्ये विलीन होणार असल्याचा दावा केला आहे. या पत्रकार परिषदेची छायाचित्रे समोर आल्यानंतर आरजेडीच्या राष्ट्रीय प्रवक्त्या प्रियंका भारती यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत जेडीयूवर तिखट शब्दांत टीका केली. जेडीयू आता कोणत्याही क्षणी भाजपमध्ये स्वतःच्या विलीनीकरणाची घोषणा करू शकते. समाजवाद विकता विकता हे नेते आता जातीयवादाच्या दुकानात सेल्समन बनून बसले आहेत, अशी घणाघाती टीका प्रियंका भारती यांनी केली.

नितीश कुमार यांच्यानंतर जेडीयूचे स्वतंत्र अस्तित्व उरले नसून ती पूर्णपणे भाजपच्या तालावर नाचत असल्याचा टोला त्यांनी लगावला. बिहार काँग्रेसचे प्रवक्ते डॉ. स्नेहाशीष वर्धन यांनी भाजपच्या मित्रपक्षांमधील रणनीतीवर गंभीर आरोप केले. भाजपची जुनी सवय आहे की ते आपल्या घटक पक्षांमध्ये 'स्लीपर सेल्स' तयार करतात, जे वेळोवेळी कठपुतळीसारखे काम करतात. जेव्हा नितीश कुमार यांना बाजूला करण्यात आले, तेव्हाच जेडीयूच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी या स्लीपर सेल्सचा बुरखा फाडला होता, असा दावा वर्धन यांनी केला.

भाजप ज्या ज्या राज्यात युती करते, तिथे हळूहळू आपल्या मित्रपक्षांनाच गिळंकृत करते. उपेंद्र कुशवाह यांच्या पक्षातही भाजपने असेच स्लीपर सेल्स नेमले होते जे विधानपरिषद निवडणुकीत उघड झाले. त्यामुळे जेडीयू आता संयुक्त राहण्याऐवजी लवकरच त्याचे तुकडे होतील, असा दावाही त्यांनी केला.

विरोधी पक्षांनी या छायाचित्रावरून रान पेटवले असले, तरी भाजप किंवा जेडीयूच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून विलिनीकरणाच्या दाव्यांवर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, केंद्रीय मंत्र्यांच्या एकत्रित पत्रकार परिषदेमुळे बिहारच्या आगामी राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा रंगू लागली आहे.

# ममता बॅनर्जी यांच्यावर चाकू हल्ल्याचा प्रयत्न

**वृत्तसंस्था, कोलकाता**

पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्या सुरक्षेवर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना घडली आहे. कालीघाट येथील दुर्गा पूजा मंडपाचे उद्घाटन करण्यासाठी जात असताना एका अज्ञात महिलेने ममता बॅनर्जी यांच्याशी गैरवर्तन करत त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. बेलेघाटाचे आमदार आणि ममता बॅनर्जी यांचे जवळचे सहयोगी कुणाल घोष यांनी दिलेल्या माहितीनुसार, ममता बॅनर्जी रस्त्यावरून चालत जात असताना ही महिला अचानक त्यांच्यासमोर आली. तिने ममता बॅनर्जी यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

हल्लेखोर महिलेच्या हातात चाकू होता आणि तिने ममता बॅनर्जी यांच्या पायावर वार करण्याचा प्रयत्न केला. हा संपूर्ण प्रकार पूर्वनियोजित कट असल्याचा संशय कुणाल घोष यांनी व्यक्त केला आहे.राज्यसभेच्या खासदार डोला सेन यांनी या प्रकरणी पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, संबंधित महिलेने स्वतःला ममता बॅनर्जी यांची भाची असल्याचे सांगितले. खासदार सेन यांनी या घटनेवर तीव्र चिंता व्यक्त करत सवाल उपस्थित केला आहे की, झेड प्लस दर्जाची सुरक्षा असलेल्या माजी मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेमध्ये इतकी मोठी त्रुटी कशी राहिली?

या तक्रारीसोबत पोलिसांना काही महत्त्वाचे फोटो आणि पुरावे सोपवण्यात आले आहेत. ती महिला पूर्णपणे दारूच्या नशेत होती आणि अत्यंत हिंसक पद्धतीने ममता बॅनर्जी यांच्या दिशेने धावून जात होती. एवढेच नाही तर ममता बॅनर्जींना इजा पोहोचवण्याच्या उद्देशाने ती महिला रस्त्यावर आडवी पडली होती.खासदार डोला सेन यांच्या मते, ही घटना अत्यंत चिंताजनक असून झेड प्लस सुरक्षा असलेल्या नेत्याच्या थेट मुख्य गेटपर्यंत असा हत्यार असलेली आणि हिंसक व्यक्ती पोहोचू शकतो, यावरून एखाद्या मोठ्या कारस्थानाची किंवा कटाची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच, घटनेच्या वेळी ममता बॅनर्जी यांना मावशी म्हणून हाक मारत ती महिला त्यांच्यावर झेप घेण्याचा प्रयत्न करत होती. घटनेनंतर तिथे उपस्थित असलेल्या राज्य पोलीस कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली.

# कर्तव्य बजावताना अपघात, महामार्ग पोलीस अमलदाराचा मृत्यू, दोन मुलींचे पितृछत्र हरपले

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे**

चंद्रपूर महामार्ग पोलीस विभागात कार्यरत असलेले पोलीस अमलदार दिगंबर धोंडिबा गुन्हाले (वय ३८) यांचे मंगळवारी, १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास हृदयविकाराने निधन झाले. काही दिवसांपूर्वी कर्तव्यावर असताना झालेल्या अपघातात त्यांच्या छातीला अंतर्गत दुखापत झाली होती.

त्यांच्यावर चंद्रपूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या अकाली निधनाने पोलीस विभागासह जिवती तालुक्यातील शेणगाव परिसरात शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ७ ऑक्टोबर रोजी कर्तव्य बजावत असताना महामार्ग पोलीस विभागाच्या वाहनाला अपघात झाला होता.

या अपघातात दिगंबर गुन्हाले यांच्या छातीला अंतर्गत मार लागला होता. त्यानंतर त्यांच्यावर चंद्रपूर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. दरम्यान, १३ ऑक्टोबर रोजी त्यांच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना हृदयविकाराचा झटका आला. दुपारी १२ वाजताच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.

दिगंबर धोंडिबा गुन्हाले हे दुर्गम जिवती तालुक्यातील शेणगाव येथील रहिवासी होते. अत्यंत सामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या गुन्हाले यांनी पोलीस दलात सेवा बजावत अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा त्यांनी दोन वेळा दिली; मात्र अवघ्या दोन-तीन गुणांनी त्यांना यशाने हुलकावणी दिली. परिस्थितीशी संघर्ष करत मोठे अधिकारी होण्याचे त्यांचे स्वप्न अखेर अपूर्णच राहिले.

कर्तव्य बजावत असताना झालेल्या अपघातानंतर उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. वडिलांचे छत्र हरपल्याने दोन्ही चिमुकल्या मुलींच्या भविष्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एका सामान्य कुटुंबातून पुढे येत पोलीस दलात सेवा बजावणाऱ्या दिगंबर गुन्हाले यांच्या अकाली निधनाने शेणगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पश्चिम आशियात तणाव

**वृत्तसंस्था, बीजिंग**

इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष सध्या शिगेला पोहोचला असून पश्चिम आशियामध्ये युद्धाची तीव्रता कायम आहे. सध्याच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठा दावा फेटाळून लावला आहे. रशिया आणि इराणला चीन सामरिक मदत करत असल्याचे वृत्त त्यांनी पूर्णपणे खोटे असल्याचे सांगितले आहे.

ट्रुथ सोशल या आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका निवेदनात ट्रम्प यांनी टीकाकारांवर कडक शब्दात निशाणा साधला. सुरू असलेल्या संघर्षात बीजिंग आणि मॉस्को इराणला पाठिंबा देऊन आपले जागतिक हितसंबंध कधीही धोक्यात घालणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, जर अशी कोणतीही मदत दिली जात असती, तर अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांनी ती खूप आधीच शोधून काढली असती, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डोनाल्ड ट्रम्प यांनी यासंदर्भात त्यांच्या एक्सवर पोस्ट शेअर केली आहे. त्यात ते म्हणाले की, कट्टर डाव्या गटांकडून सातत्याने हे निराधार दावे केले जात आहेत की, चीन आणि रशिया इराणला सर्व प्रकारच्या संकटांतून बाहेर काढण्यासाठी आणि लष्करी अथवा सामरिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत करत आहेत. जर ते सहकार्य करत असतीलच, तर ते अत्यंत मर्यादित स्वरूपात असेल. रशिया किंवा चीन सध्या इराणला कोणत्याही प्रकारे मदत करत आहेत, यावर आपला अजिबात विश्वास नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय स्तरावर या दोन्ही महासत्तांचे मोठे नुकसान होऊ शकते, त्यामुळे या संघर्षात थेट सहभागी होण्याचा धोका ते निश्चितपणे पत्करणार नाहीत, असेही ते म्हणाले आहेत.

**अमेरिकेपासून काहीही लपू शकत नाही**

इराणला अन्य देशांकडून



मिळणारी कोणतीही गुप्त लष्करी किंवा तांत्रिक मदत अमेरिकेच्या देखरेख ठेवणाऱ्या यंत्रणांपासून लपून राहू शकत नाही, असे ट्रम्प म्हणाले. जर असे काही घडले, तर अमेरिकेला त्याची तत्काळ आणि त्वरित माहिती मिळेल. इराणच्या अणुकार्यक्रमाबाबत आपली कठोर भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित करताना ट्रम्प म्हणाले की, तीव्र दबाव आणि निर्बंध असूनही इराणला वॉशिंग्टनसोबत करार करण्याची खरोखरच इच्छा आहे. परंतु पुढे कसे जायचे हे त्यांना सुचत नाही.

संपादकीय लेखणीतून...

# सर्वोच्च न्यायालयाची तंबी

सध्या देशात जे काही सुरू आहे ते समजण्यापलीकडचे आहे. सरकार नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणतेय म्हणून न्यायालयाची दारे ठोठावली की न्यायालय नागरिकांना दिलासा देण्याचे काम करतेय असे वाटते खरे; परंतु आतली गोम वेगळीच आहे असे दिसते. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी सुरू असलेल्या सीजेपी आणि अन्य पक्ष व संघटनांच्या आंदोलनावरून सर्वोच्च न्यायालयात रविवारी विशेष सुनावणी झाली. शांततेत सुरू असलेल्या आंदोलनांवर कारवाई करण्याची तंबी देतानाच नागरिकांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. कायदा व सुव्यवस्थेच्या अटींच्या अधीन राहून दिल्ली मेट्रोची सेवा नियमित वेळापत्रकानुसार सुरू ठेवावी आणि इंटरनेट सेवांमध्ये व्यत्यय आणू नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. नागरिकांच्या मुक्त हालचालीस वाहतूक नियमांच्या अधीन राहून परवानगी दिली जावी. कायदा-सुव्यवस्था व वाहतुकीची इतर परिस्थिती लक्षात घेऊन बॅरिकेड (अडथळे) लावण्याच्या आवश्यकतेचा त्वरित आढावा घेतला जावा.

मेट्रो व इंटरनेट सुविधा विना अडथळा सुरू राहतील, असे सुनिश्चित करावे; मात्र माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये कारवाई करण्याचे प्रशासनाचे अधिकार हिरावून घेतलेले नाहीत, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. म्हणजे सर्वोच्च न्यायालय केंद्र सरकारला खडसावून नेमके असे काही सांगतच नाही. उलट परवानगी दिली जावी, बॅरिकेड आढावा घ्यावा, सुनिश्चित करावे असे विनंतीवजा निर्देश दिले जातात. झालेच पाहिजे असे खडसावून आदेश दिले जात नाहीत. कायद्यानुसार इंटरनेट सेवा विनाव्यत्यय सुरू राहाव्यात. इंटरनेट सेवा सुरू ठेवण्याचे निर्देश देताना आम्ही माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत असलेले अधिकार काढून घेत नाही, असे न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही मोहना यांच्या खंडपीठाने म्हटले. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सुनावणी दरम्यान सांगितले की, जंतर मंतरच्या ४ कि. मी. परिसरातील नागरिकांना तसेच रेल्वेने प्रवास करणाऱ्या व्यक्तींनाही पोलिसांकडून ताब्यात घेतले जात आहे. ९ ऑक्टोबरच्या न्यायालयीन आदेशानंतरही ४५ मेट्रो स्थानकांवर प्रवाशांना प्रवेश आणि बाहेर पडण्यास बंदी घालण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयोगाविरोधातील आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांनी बळाचा मोठ्या प्रमाणात वापर केल्याचा आरोप करणाऱ्या मनोज झा यांच्या याचिकेचाही विचार न्यायालय करत आहे. झा यांनी दाखल केलेल्या याचिकेत निःशस्त्र आंदोलक, विद्यार्थी नेते, वकील, राजकारणी आणि सामान्य नागरिकांना बेकायदेशीरपणे ताब्यात घेणे, त्यांचे अपहरण करणे आणि त्यांना नजरकैदेत ठेवणे, असे आरोप करण्यात आले आहेत. महिला आंदोलकांचा लैंगिक छळ केल्याचाही आरोप याचिकेत करण्यात आला आहे. नवी दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील आंदोलकांवर पोलिसांनी घातलेले निर्बंध आणि मतदार यादी पुनरीक्षणातील कथित अनियमिततेच्या मुद्यावर ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी वारंवार न्यायालयाचे दरवाजे ठोठावून मी आता पूर्णपणे थकलो आहे, अशा शब्दांत त्यांनी आपली उद्विग्नता बोलून दाखवली. सिब्बल म्हणाले, सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी जाऊन काही उपयोग होतो असे आता मला वाटत नाही. देशातील जनतेला वाटते की, हे सरकार बदलले पाहिजे. सध्याच्या कठीण परिस्थितीत जर कोणी राज्यघटना वाचवू शकत असेल तर ते केवळ सर्वोच्च न्यायालय मात्र तिथे जाऊनही सर्वसामान्यांना दिलासा मिळत नसल्याने न्यायालयाकडून माज्या फारशा अपेक्षा उरलेल्या नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. सरन्यायाधीशांवर आपण समाधानी आहात का? या प्रश्नाला उत्तर देताना सिब्बल म्हणाले आम्ही वकील आहोत त्यामुळे कोणावर समाधानी व असमाधानी असण्याचा प्रश्न येत नाही. नागरिकांवर अन्याय झाला की आम्ही याचिका दाखल करणारच, मग न्यायालय आमचे म्हणणे ऐको किंवा न ऐको. जनतेच्या बाजूने खटला लढणे हे आमचे कर्तव्य आहे; मात्र जेव्हा घटनात्मक संस्थांकडूनच न्याय मिळण्याची आशा मावळते तेव्हा स्वतःपुरते बोलायचे झाले तर माझा न्यायालयावरील विश्वास उडाला आहे.

# एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचा प्रदीर्घ संघर्ष आणि तुकाराम मुंढे नावाचे 'ब्रह्मास्त्र'

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

पुणे येथे गेल्या अनेक दिवसांपासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भोंगळ कारभाराविरोधात आणि वाढत्या पेपरफुटीच्या घटनांविरोधात सुरू असलेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या प्रदीर्घ आणि संघर्षमय आंदोलनाला अखेर ११ ऑक्टोबर २०२६ रोजी एक मोठे आणि ऐतिहासिक यश प्राप्त झाले आहे. अन्न व औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेचा पेपर फुटल्याची गंभीर घटना उघडकीस आल्यानंतर विद्यार्थ्यांचा आयोगाच्या कार्यपद्धतीवरील आणि एकूणच परीक्षा व्यवस्थेवरील उरलासुरला विश्वास संपुष्टात आला होता. पोटाला चिमटा काढून पुण्यात रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पदरी वारंवार निराशाच पडत असल्याने, संतप्त विद्यार्थ्यांनी आयोगाचे विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची आक्रमक मागणी करत पुण्यात मोठे ठिय्या आंदोलन पुकारले होते.

या न्याय्य आंदोलनाला पाठिंबा देत आमदार रोहित पवार यांनीही अध्यक्षपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करावी, अशी आग्रही मागणी राज्य शासनाकडे लावून धरली होती. विद्यार्थ्यांचा वाढता आक्रोश पाहता, शासनाचे प्रतिनिधी म्हणून राज्याचे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रत्यक्ष आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी सविस्तर संवाद साधला आणि मुख्यमंत्र्यांच्या वतीने सकारात्मक निर्णय जाहीर करून या आंदोलनावर यशस्वी तोडगा काढला.

या संपूर्ण प्रक्रियेत शासनाने एक महत्त्वाची कायदेशीर आणि तांत्रिक बाजू देखील स्पष्ट केली. महाराष्ट्र लोकसेवा आयोग ही एक घटनात्मक आणि पूर्णपणे स्वायत्त संस्था असल्याने राज्य शासनाला आयोगाच्या अध्यक्षांना थेट त्यांच्या पदावरून हटवण्याचा कोणताही अधिकार नाही; हा विशेष अधिकार केवळ देशाच्या राष्ट्रपतींनाच बहाल करण्यात आला आहे. ही कायदेशीर गुंतागुंत लक्षात घेऊन, राज्य शासनाने मधला आणि प्रभावी मार्ग निवडला. शासनाने पहिल्या टप्प्यात तातडीने विद्यमान सचिवाची बदली केली आणि पेपरफुटीच्या सखोल न्यायिक चौकशीचे स्पष्ट आश्वासन दिले. या आश्वासनाची पूर्तता करताना केवळ कागदी घोडे न नाचवता, प्रत्यक्ष कृतीतून पारदर्शकता सिद्ध करण्यासाठी शासनाने सन २००५ च्या बॅचचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे आयोगाच्या सचिवपदाची तसेच पेपरफुटीच्या चौकशी समितीच्या अध्यक्षपदाची दुहेरी आणि अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. प्रशासनातील अत्यंत कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंढे यांच्या नियुक्तीमुळे प्रशासकीय ढिसाळपणामुळे त्रस्त झालेल्या लाखो तरुण उमेदवारांच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या आहेत.

तुकाराम मुंढे यांच्या नावाचा संपूर्ण राज्य प्रशासनात एक वेगळाच दबदबा आहे. आपल्या कामातील अत्यंत पारदर्शकता, प्रामाणिकपणा, शून्य तडजोड आणि संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला शिस्त लावणारे अधिकारी अशी त्यांची राज्यभरात ख्याती आहे. सर्वसामान्यांचे खरे नायक मानल्या जाणाऱ्या मुंढे यांची त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील ही तब्बल २५ वी बदली ठरली आहे. यापूर्वी त्यांनी आपत्ती व्यवस्थापन सचिव, दिव्यांग कल्याण सचिव आणि अन्न व औषध प्रशासन आयुक्त यांसारख्या अनेक अतिशय महत्त्वाच्या आणि आव्हानात्मक पदांवर आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे.

अशा एका निष्कलंक आणि कठोर अधिकाऱ्याची जेव्हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगासारख्या अत्यंत महत्त्वाच्या संस्थेत चौकशी आयोगाचे अध्यक्ष आणि सचिव म्हणून नियुक्ती होते, तेव्हा भ्रष्ट प्रवृत्तींना आणि गैरव्यवहार करणाऱ्यांना एक अत्यंत स्पष्ट संदेश जातो की, आता यापुढे कोणाचीही गय केली जाणार नाही. मुंढे यांच्या नियुक्तीमुळे आता केवळ थातूरमातूर चौकशी न होता, प्रकरणाच्या मुळापर्यंत जाऊन सर्व दोषींवर कठोर कारवाई होईल, असा ठाम विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला आहे. परिणामी, पुण्यातील आंदोलक विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, या एका ऐतिहासिक निर्णयामुळे आयोगाची हरवलेली विश्वासार्हता पुन्हा प्रस्थापित होण्यास आणि प्रामाणिकपणे कष्ट करणाऱ्या लाखो तरुणांना खऱ्या अर्थाने न्याय मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

– ९५६१५९४३०६

# तिसऱ्या 'टि-२०' मधील सर्वाधिक महत्त्वाच्या बाबी

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

रांची येथे भारताविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यादरम्यान केलेल्या कृतीबद्दल वेस्ट इंडिजचे फलंदाज रोव्हमन पॉवेल आणि शेर्फेन रदरफोर्ड यांना आयसीसीने फटकारले आहे. दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे. आयसीसीच्या मते, बाद झाल्यानंतर पॉवेलने बॅटने चेंडू दूर मारून नियमांचे उल्लंघन केले, तर रदरफोर्डने पंचांनी वाईड न देण्याच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली. दोन्ही खेळाडूंनी आपला गुन्हा कबूल केला आहे.

**पॉवेलने बाद झाल्यानंतर बॅटने चेंडू दूर मारला**

रोव्हमन पॉवेलवर आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.२ चे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे, जे आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान क्रिकेट उपकरणे, कपडे, मैदानातील उपकरणे किंवा इतर सुविधांच्या गैरवापराशी संबंधित आहे. भारतीय गोलंदाज मयंक यादवने वेस्ट इंडिजच्या डावाच्या सहाव्या षटकात पॉवेलला बाद केले. पॅव्हेलियनमध्ये परतताना पॉवेलने बॅटने चेंडू दूर मारला. आयसीसीने हे वर्तन आचारसंहितेचे उल्लंघन मानले आणि त्याला अधिकृत ताकीद देण्यासोबतच एक डिमेरिट पॉइंट दिला. रोव्हमन पॉवेल मयंक यादवच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. जेव्हा वाईड घोषित करण्यात आला नाही, तेव्हा रदरफोर्डने नाराजी व्यक्त केली.

शेर्फेन रदरफोर्ड आयसीसीच्या आचारसंहितेच्या कलम २.८ चे उल्लंघन केल्याबद्दल दोषी आढळला. हा नियम आंतरराष्ट्रीय सामन्यात पंचांच्या निर्णयावर असहमती दर्शवण्याशी संबंधित आहे. ही घटना वेस्ट इंडिजच्या डावाच्या १३ व्या षटकात घडली. पंचांनी चेंडू वाईड घोषित न केल्यामुळे रदरफोर्ड संतापला. त्याने पंचांकडे आक्रमकपणे आपली नाराजी व्यक्त केली.

**चार अधिकाऱ्यांनी आरोप लावले**

दोन्ही खेळाडूंवरील आरोप मैदानातील पंच जयरामन मदनगोपाल आणि रोहन पंडित, तिसरे पंच नितीन मेनन आणि चौथे पंच वीरेंद्र शर्मा यांनी लावले.

**मयंक यादवने मालिकेतील सर्वात वेगवान चेंडू टाकला**

मयंक यादवने तिसऱ्या षटकाचा पहिला चेंडू ताशी १५१ किमी वेगाने टाकला. ऑफ स्टंपच्या बाहेर टाकलेला हा चांगल्या लांबीचा चेंडू शिमरॉन हेटमायरच्या हातून निसटला. हा मालिकेतील सर्वात वेगवान चेंडू होता.

**तिलक वर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५० झेल पूर्ण**

तिलक वर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५० झेल पूर्ण केले असून, असा पराक्रम करणारा तो पाचवा भारतीय खेळाडू ठरला आहे. यापूर्वी ६५ झेलसह रोहित शर्मा हा पहिला खेळाडू आहे.

**भारताने नोंदवली टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील तिसरी सर्वोच्च सर्वबाद धावसंख्या**

भारत आपल्या पूर्ण २० षटकांत २२३ धावांवर सर्वबाद झाला. पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील ही तिसरी सर्वोच्च सर्वबाद धावसंख्या आहे. या यादीत तुर्कस्तान २३७ धावांसह अव्वल स्थानी आहे.

**मैदानात सामना सुरू, पण काही प्रेक्षक बाहेरच!**

या सामन्यातील सर्वांत गंभीर आणि दुर्लक्षित मुद्दा म्हणजे प्रेक्षक व्यवस्थापन. वृत्तानुसार, सामना सुरू झाल्यानंतरही सुमारे तीन ते चार हजार प्रेक्षक प्रवेशासाठी बाहेर थांबले होते. गर्दीच्या व्यवस्थापनावर आणि प्रवेशातील विलंबावर प्रश्न उपस्थित झाले. हजारो रुपये खर्चून तिकीट घेणाऱ्या प्रेक्षकाला वेळेवर प्रवेश मिळत नसेल, तर आयोजनाच्या भव्यतेचा उपयोग काय?

**अवघ्या ११३ मिनिटांत तिकिटे संपली; क्रिकेटचे वाढते बाजारमूल्य**

११ ऑक्टोबरच्या सामन्यासाठी सर्वसाधारण तिकिटांचा उपलब्ध साठा ऑनलाइन विक्री सुरू झाल्यानंतर ११३ मिनिटांत संपल्याचे वृत्त होते. तिकिटांचे दर साधारण १,००० ते १२,५०० पर्यंत होते. क्रिकेटची लोकप्रियता वाढत असताना सामान्य कुटुंबाला प्रत्यक्ष मैदानात जाऊन सामना पाहणे कितपत परवडते? क्रिकेटचा प्रेक्षक हा केवळ ग्राहक बनत चालला आहे का.

**प्रेक्षकांची सुरक्षितता ही विजयापेक्षा मोठी जबाबदारी**

सुमारे २४,८०० प्रेक्षकांनी सामना पाहिल्याचे वृत्त आहे. अशा गर्दीत प्रवेशद्वारे, रांगा, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग, पोलिस बंदोबस्त आणि वैद्यकीय सुविधा या केवळ प्रशासकीय बाबी राहत नाहीत; त्या सार्वजनिक सुरक्षिततेशी जोडलेल्या असतात.

मैदानातील प्रत्येक चौकारासाठी व्यवस्था सज्ज असते; पण गर्दीमुळे एखादी दुर्घटना घडू नये यासाठी तितकीच काटेकोर तयारी असते का?

**नवरात्र आणि क्रिकेटचा सांस्कृतिक संगम**

सामन्याच्या दिवशी नवरात्रोत्सव सुरू होत असल्याने होळकर स्टेडियममध्ये केवळ शाकाहारी आणि उपवासाला अनुरूप खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यात आली होती. मोठ्या क्रीडा आयोजनात स्थानिक संस्कृती, सण आणि प्रेक्षकांच्या विविध गरजा लक्षात घेतल्यास खेळ आणि समाज यांचे नाते अधिक घट्ट होऊ शकते.

**मनोरंजन की व्यावसायिक महोत्सव?**

महागडी तिकिटे, प्रचंड मागणी, प्रकाश-ध्वनीचा झगमगाट आणि हजारो प्रेक्षकांची उपस्थिती यांमुळे आंतरराष्ट्रीय टी-२० सामना हा केवळ क्रीडा कार्यक्रम न राहता मोठा मनोरंजन व्यवसाय बनला आहे. मात्र या व्यावसायिक यशासोबत प्रेक्षकांचा अनुभव, सुविधा आणि सुरक्षितता यांचाही दर्जा वाढला पाहिजे. आयोजकांच्या उत्पन्नाचे आणि प्रायोजकांच्या प्रसिद्धीचे मोजमाप होते; पण प्रेक्षकांच्या समाधानाचे मोजमाप कोण करणार?

– ९०९६३७२०८२

# एकट्या ज्ञानेश कुमारांना वाचविण्यासाठी सरकार कासावीस का? दिल्लीत अघोषित बंदी कशासाठी? ही कसली लोकशाही!

**रमेश लांजेवार**
**नागपूर**

सरकारची किती मनमानी सुरू आहे ही बाब सुप्रीम कोर्टाच्या हंटरवरून लक्षात येते सुप्रीम कोर्टाने सरकारला सुनावले की बॅरिकेड्स हटवा, इंटरनेट सुरू करा.याव्यतीक्त केंद्रीय गृहसचिव,दिल्ली पोलिसांना सुद्धा नोटीस बजावली यामध्ये आंदोलना दरम्यान वाहतूक सेवावरील निर्बंध संदर्भातील आपल्या आधीच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी सुप्रीम कोर्टाने अवमान कारवाई करण्याप्रकरणी केंद्रीय गृहसचिव, दिल्ली पोलीस आयुक्त आणि दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन यांनाही नोटीस बजावली आहे. सुप्रीम कोर्टाने यांना नोटीस बजावली याचे स्वागत आहे. परंतु बॅरिकेड्स, इंटरनेट सेवा बंद करने, एकट्या ज्ञानेश कुमारसाठी ३८ हजार जवानांचा पहारा, दिल्लीकडे येणाऱ्या ट्रेन रद्द, ५७ मेट्रो स्टेशन बंद हे आदेश तेथील प्रशासनाला आणि आयुक्तांना किंवा अधिकाऱ्यांना कोणी दिले त्या राजकीय पुढाऱ्यांवर किंवा मंत्र्यांवर सुप्रीम कोर्टाने कठोर कारवाई करावी अशी माझी विनंती आहे. कारण जेन-झीचे किंवा सर्वसामान्यांच्या किंवा विरोधी पक्षाच्या तक्रारी न ऐकता बळाचा वापर करून हुकूमशाही सारख्या पद्धतीने कारवाई करणे म्हणजे देश विरोधी कारवाई म्हणावी लागेल. कारण आंदोलन करते देशाचे नागरिक व युवा आहेत त्यांच्या समस्यांचा यत्किंचितही विचार न करता एकट्या ज्ञानेश कुमारसाठी बळाचा वापर करून देशाचे करोडों रूपयांचे सुरक्षेसाठी खर्च करणे ही हुकूमशाहीची नांदीच म्हणावी लागेल.

गेल्या तीन-चार दिवसांच्या घटनेमुळे देशाची बदनामी होत आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे आणि हेही लक्षात ठेवले पाहिजे की,एकटा ज्ञानेश कुमार म्हणजे देश नाही किंवा सरकार नाही त्यामुळे देशाची परिस्थिती खराब करणाऱ्या ज्ञानेश कुमार यांच्यावर सुप्रीम कोर्टाने कठोर कारवाई करावी. आज अर्धा देश कोरड्या दुष्काळाशी झुंज देत आहे यावर्षी पाऊस कमी झाल्याने देशात पाणी टंचाईचा गंभीर प्रश्न उपस्थित आहे आणि सरकार एकट्या ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यासाठी ऐडीचोटीचे प्रयत्न करीत असून देशाची सुरक्षा यंत्रणा व संपूर्ण वाहतूक यंत्रणा ठप्प करून देशाचे करोडों रुपए पाण्यासारखे उडवत आहेत व देशाला आर्थिक अडचणीत टाकत आहे ही कसली सरकार व लोकशाही म्हणावी! सरकारने गोरगरीब, शेतकरी-शेतमजूर, बेरोजगार, सर्वसामान्य यांना मदत करण्याचे सोडून संपूर्ण ताकद सरकारने ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यासाठी खर्च करीत आहे याची सरकारला लाज वाटायला पाहिजे.

आज विरोधी पक्षाचे लोकसभा व राज्यसभा मिळून ३०० खासदार ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात उभे ठाकले असून राजीनाम्याची मागणी करीत आहेत तरीही सरकारच्या नाकावरील माशी उडायला तयार नाही हा अत्यंत गंभीर व चिंतेचा विषय आहे. सरकारला सुप्रीम कोर्टाने हंटर मारला तरीही पोलिसांकडून कडक बंदोबस्त व धरपकड सुरूच आहे परंतु आता युवा पिढी सरकारच्या दमनशाहीला घाबरणार नसल्याचे दिसून येते. कारण सध्या देशात आणीबाणी सारखी गंभीर परिस्थिती सरकारने निर्माण केली आहे. यामागचा सरकारचा एकच उद्देश असावा की, देशातील १४५ कोटी जनतेच्या मुलभूत गरजा, महागाई, बेरोजगारी,पेपर फुटी,एमपीएससी पेपर फुटी, महागडे शिक्षण,कोरडा दुष्काळ, शेतकरी - शेतमजूराच्या आत्महत्या यावर पडदा टाकण्यासाठी ज्ञानेश कुमारला बाहूले बनवून वापर करून देशाच्या १४५ कोटी जनतेची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट दिसून येते. परंतू आता" जेन-झी रूकेगा नही साला" अशा कठोर भुमिकेत दिसतो.

सरकारला सुप्रीम कोर्टाचा हंटर पडूनही डगमगतांना दिसत नाही याचा अर्थ असा की सरकार लोकशाहीची पायमल्ली करीत आहे की काय असे चित्र स्पष्ट दिसत आहे. दिल्लीतील जंतर मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीकेपी) आंदोलनाआधी झालेल्या सरकारच्या कारवाईचा आणि पोलीस बळाच्या वापराबाबत सुप्रीम कोर्टाने सरकारची चांगलीच कानउघाडणी केली. तरीही सरकार बेशरमासारखी कठोर आणि निष्ठुर असल्याचे दिसून येते. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी कॉक्रोच जनता पार्टीने १० ऑक्टोबरच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारला मोठा धसका बसला यामुळे दिल्लीत अभुतपुर्व बंदोबस्त करण्यात आला. सीजेपीच्या आंदोलनाला घाबरून सरकारने ३८ हजार सुरक्षा सैनिकांची तुकडी राजधानीत आणली,तसेच ५७ मेट्रो स्टेशन बंद केले व दिल्लीकडे देशभरातून येणाऱ्या मेल,एक्सप्रेस गाड्या दोन दिवस रद्द केल्या हा सर्व प्रकार ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यासाठी सरकार करीत असल्याचे जनतेच्या लक्षात आले आहे.

ज्ञानेश कुमारच्या कारणाम्यावरून लक्षात येते की सरकारला एसआयआर व निवडणूकी संदर्भात मोठी मदत केली असावी आणि त्यांमुळेच सरकार ज्ञानेश कुमारला वाचविण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असावेत. सरकारच्या धोरणावरून स्पष्ट होते की "हम करे सो कायदा" परंतु हि ताणाशाही जास्त दिवस चालू शकत नाही. सरकार लोकप्रतिनिधी व पक्ष फोडून राज्य करीत आहे आणि हे संपूर्ण काम सरकार मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मार्फत करीत आहेत आणि आता एसआयआर प्रक्रिये मार्फत देशातील विशिष्ट लोकांचे किंवा धर्माचे किंवा जातीचे करोडोंच्या संख्येने मतदार यादीतून नाव कमी करण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे सरकारला दुसऱ्या पक्षातील भ्रष्टाचारी नेते चालतात आणि पक्ष प्रवेश केला की, भ्रष्टाचार मुक्त होतात या संपूर्ण प्रक्रिया सरकार मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मार्फत करून घेत आहेत.

त्यामुळेच सरकार ज्ञानेश कुमारच्या पाठीशी असल्याचे दिसून येते. आज सीजेपीने ज्ञानेश कुमार यांच्या विरुद्ध आंदोलन पुकारले यावर सरकारने ताबडतोब एक्शन घेऊन ज्ञानेश कुमार यांना हटविले असते किंवा सीजेपीसोबत चर्चा केली असती तर हजारोंच्या संख्येने सुरक्षा सैनिकांची गरज दिल्लीमध्ये पडली नसती व मेट्रो स्टेशन बंद, ट्रेन रद्द,बसेस रद्द याची सरकारला गरजही भासली नसती.परंतु सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आणि हेकेखोरीमुळे दिल्लीत येणाऱ्या व जाणाऱ्या लाखो ते करोडो प्रवाशांचे व स्थानिक लोकांचे काय हालबेहा झाले व होत आहेत याचा सरकारने कदापि विचार केला नाही ही बाब सरकारच्या घृणास्पद कारवाई वरून लक्षात येते.

सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे गेल्या तीन दिवसांत देशाचे व दिल्लीतील नागरिकांचे व व्यापाऱ्यांचे करोडोंचे नुकसान झाले व मानसिक त्रास सुध्दा झाला.यावर सरकार चुप्पी साधल्याचे दिसून येते. सध्या देशात लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आहेत. याचा अर्थ असा नाही की, हुकूमशाही पद्धतीने कार्य करणे. ही लोकशाही आहे लोकांचे म्हणणे सरकारला ऐकावेच लागेल. सरकार आपल्या बहुमताच्या जोरावर बळाचा वापर करीत असेल तर ही स्वतंत्र भारताची शोकांतिका म्हणावी लागेल. भारतात लोकशाही पध्दतीने शांततेत आंदोलन करण्याची परंपरा आहे आणि संविधानाने त्याचा अधिकार सुध्दा सर्वांना दिला आहे त्याच पद्धतीने ज्ञानेश कुमार यांच्या चुकीच्या धोरणाविरोधात देशभरात सर्वत्र शांततेने आंदोलन सुरू आहे. परंतु हे आंदोलन दडपण्यासाठी व ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यासाठी सरकार वाटेल ते प्रयत्न करून देशाचे करोडो ते अरबो रूपयांचा चुराडा सरकार कडून होतांना दिसते.

१९४७ ला देश स्वतंत्र झाला. त्यानंतर देशात ज्यांची- ज्यांची सरकार आली त्यांनी-त्यांनी देशाला व देशातील जनतेला कुठलाही धक्का न लागता ज्या-ज्या ठिकाणी चुका झाल्या त्या पार्श्वभूमीवर आपापल्या चुका त्यावेळच्या मंत्र्यांनी व अधिकाऱ्यांनी स्विकारल्या व आपल्या पदाचे राजीनामे दिले आहेत. यात मग कोणाचीही सरकार असो. साध्या रेल्वे दुर्घटना झाल्या त्यासाठी सुध्दा नैतिक जबाबदारी स्वीकारून अनेक मान्यवरांनी आपापल्या पदाचे राजीनामे दिले आहेत हा स्वतंत्र भारताचा इतिहास आहे. परंतू आतातर देशात जनुकाय ताणाशाही आली की काय असे चित्र दिसत आहे.

देशात २०१४ पासून भाजपाचे सरकार आहे त्यांचे आतापर्यंत कार्य सुरळीत होते यात दुमत नाही.परंतु ज्या-ज्या ठिकाणी सत्ताधारी राजकीय पुढाऱ्यांनी चुका केल्या त्यांना नेहमी सरकारने झाकून ठेवले व त्यांना पाठीशी घालुन देशात गंभीर परिस्थिती निर्माण केली. त्याचप्रमाणे केंद्र सरकार व भाजपा शासित राज्य सरकारांनी लोकप्रतिनिधींना फोडा आणि राज्य करा अशी रणनीती आखली आहे.

– ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी निवासव्यवस्था

**२३ हजार १०० क्षमतेचे २४ निवास कक्ष, निवासव्यवस्थेच्या ठिकाणी प्रेरणादायी वातावरण, प्रशासनाच्या पुढाकाराने अनुयायांसाठी सुविधा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे दरवर्षी असंख्य अनुयायी येत असतात. त्यांच्यासाठी प्रशासनाच्यावतीने विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाते. यावर्षी पहिल्यांदाच लांबून येणाऱ्या अनुयायांसाठी निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. एकाच वेळी २३ हजारावर अनुयायी थांबू शकतील, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.



निवास व्यवस्थेसाठी वेगवेगळ्या ठिकाणी कक्ष स्थापन करण्यात आले आहे. त्यात सामाजिक न्याय भवन, दीक्षाभूमी परिसर, पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीचा परिसर, आयटीआय इमारत, जिल्हा हिवताप कार्यालय, कुर्वेज शाळा, उंटखाना, बेझनबाग, ड्रॅगन पॅलेस कामठी याठिकाणी एकून २१ निवास कक्षात प्रत्येकी एक हजार याप्रमाणे २१ हजार अनुयायांची व्यवस्था केली जाणार आहे. याशिवाय सामाजिक न्याय भवन येथे प्रत्येकी ७०० क्षमतेचे दोन निवास कक्ष तर विदर्भ विकास महामंडळ येथे ७०० याप्रमाणे २ हजार १०० अनुयायांची अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली आहे.

निवास कक्षाच्या ठिकाणी अनुयायांसाठी फॅन, कुलर, शुद्ध पिण्याचे पाणी तसेच मोबाईल चार्जींगसाठी सॉकेटची व्यवस्था राहणार आहे. प्रत्येकास स्वच्छ अंथरून, पांघरून व आवश्यक बेडींग सुविधा, अखंडीत वीज पुरवठ्यासाठी जनरेटरची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. अनुयायांच्या काही समस्या असल्यास त्याच्या तत्काळ सोडवणूकीसाठी प्रत्येक कक्षात तक्रार निवारण कक्ष, माहिती व मार्गदर्शन सुविधा, तक्रार नोंदणी व निवारण व्यवस्था राहणार आहे. सोईसाठी प्रत्येक कक्षास नावे देण्यात आली आहे.

**लहान बाळांसह येणाऱ्या मातांना सुविधा**

आपल्या लहान बाळांसह येणाऱ्या महिला अनुयायांसाठी विशेष व्यवस्था निवास कक्षात राहणार आहे. बाळ असलेल्या महिलांसाठी हिरकणी कक्ष, स्वच्छ, सुरक्षित आणि गोपनीय कक्ष, आवश्यक साहित्य व आराम सुविधा पुरविण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक कक्षात महिलांसाठी सॅनिटरी पॅड व्हेंडींग मशिन बसविण्यात येणार आहे.

**भिमसृष्टी : बाबासाहेबांच्या विचारांचे दालन**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील सर्वच घटक तसेच क्षेत्रासाठी प्रचंड काम केले. त्यांचे सामाजिक काम, विचारांचे दर्शन घडविण्यासाठी प्रत्येक निवास कक्षात भिमसृष्टी नावाचे दालन, प्रदर्शन उभारण्यात येणार आहे. याठिकाणी बाबासाहेबांचे विचार व जीवनप्रवासाची माहिती, साहित्य, चित्रफित राहणार असून प्रेरणादायी वातावरण निर्माण केले जातील.

**निवास सुविधेसाठी प्रशासनाचा पुढाकार**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी येथे देशभरातून अनुयायी येतात. हजारे अनुयायी लांबचा प्रवास करून येत असल्याने त्यांची निवास व इतर अत्यावश्यक सुविधा निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे याबाबतची संकल्पना सादर केली होती. मुख्यमंत्र्यांच्या सहमतीने जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून पहिल्यांदाच निवास व इतर आवश्यक सुविधा उभ्या राहिल्या आहे.

## खत गैरव्यवहारातील 'फरार' सहव्यवस्थापक अखेर जाळ्यात!

**३३.५१ लाखांच्या हिशेबाचे गूढ उलगडणार? सुरेश नागोसे १५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडीत**

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शेतकऱ्यांच्या हितासाठी उभारलेल्या सहकारी संस्थेतच खत विक्रीच्या व्यवहारातून ३३ लाख ५१ हजार ५० रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात दोन महिन्यांपासून फरार



असलेला निलंबित सहव्यवस्थापक सुरेश नागोसे अखेर पोलिसांच्या हाती लागला. नागपूरहून भिवापूरच्या दिशेने एसटी बसने येत असताना कारगाव शिवारात आज सकाळी त्याला ताब्यात घेण्यात आले. येथील न्यायालयाने त्याला १५ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. भिवापूर तालुका खरेदी-विक्री सहकारी संस्थेतील या कथित गैरव्यवहाराने सहकार क्षेत्रातील कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. एवढ्या मोठ्या रकमेच्या व्यवहारात नेमके काय घडले, पैशांचा विनियोग कुठे झाला आणि या प्रकरणात आणखी कोणाचे हात गुंतले आहेत, याची उत्तरे आता तपासातून मिळण्याची अपेक्षा आहे.

**एकाला अटक, दुसरीला जामीन; आता नागोसेच्या चौकशीकडे लक्ष!**

याच प्रकरणात निलंबित स्टोअरकीपर मिरा खोब्रागडे यांना २९ सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली होती. पोलीस कोठडीनंतर न्यायालयीन कोठडीत असलेल्या खोब्रागडे यांची जामिनावर सुटका झाली. मात्र, प्रमुख आरोपी नागोसे फरार असल्याने तपासाची दिशा आणि गैरव्यवहारातील आर्थिक व्यवहारांची साखळी याबाबत प्रश्न उपस्थित होत होते. आता नागोसे पोलिसांच्या ताब्यात आल्याने त्याच्या चौकशीतून महत्त्वाचे धागेदोरे मिळतात का, याकडे लक्ष लागले आहे.

**३३ लाखांचा हिशेब कोण देणार?**

खत विक्रीच्या व्यवहारात लाखोंचा कथित गैरव्यवहार होणे ही केवळ आर्थिक अनियमिततेची बाब नाही; हा शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित गंभीर विषय आहे. संस्थेतील आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण कोणाचे होते? संबंधित रकमेची नोंद आणि हिशेब कसा ठेवण्यात आला? या प्रकरणात अन्य कोणी सहभागी आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. नागोसेच्या अटकेने प्रकरणातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला असला, तरी केवळ अटकेने गैरव्यवहाराचा उलगडा होत नाही. ३३ लाख ५१ हजार ५० रुपयांच्या कथित गैरव्यवहाराची संपूर्ण साखळी उघड करून जबाबदारी निश्चित करणे, हेच तपासासमोरील खरे आव्हान आहे. ३३ लाखांचा हिशेब लागणार कधी आणि या प्रकरणातील संपूर्ण सत्य बाहेर येणार कधी? याकडे तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते ५१ फूट उंच ध्वजाच्या ध्वजारोहनाने महाकाली महोत्सवाचा शुभारंभ: मातेच्या चांदीच्या मूर्तीची निघाली पालखी

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मनोरंजनाचे कार्यक्रम रद्द, सामाजिक उपक्रम आणि धार्मिक परंपरा मात्र कायम**

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर -धनंजय पांढरे**

शारदीय नवरात्रोत्सवाच्या घटस्थापनेनिमित्त रविवारी, ११ ऑक्टोबर रोजी श्री माता महाकाली मंदिरात ५१ फूट उंच ध्वजाचे विधिवत ध्वजारोहण करण्यात आले. श्री माता महाकाली महोत्सव ट्रस्टच्या वतीने आयोजित माता महाकाली महोत्सव २०२६ अंतर्गत हा सोहळा पार पडला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी मंदिरात उपस्थित राहून चांदीच्या माता महाकाली मूर्तीचे दर्शन घेतले त्यानंतर मातेची पालखी निघाली.

यावेळी मनीष महाराज, सुनिल महाकाले, राजु शास्त्रकार, अजय जयस्वाल, श्याम धोपटे, मिलिंद गंपावार, बलराम डोडाणी, प्रसाद जोरगेवार, संजू बुरघाटे, अरुण तिखे, सविता दंढारे, वंदना हातगावकर यांच्यासह श्री महाकाली माता महोत्सव ट्रसचे पदाधिकारी भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन यंदा महोत्सवातील मनोरंजनाचे कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कार्यक्रमांसाठी होणारा खर्च वाचवून दुष्काळग्रस्त शेतकर्यांना मदत करण्याचा मानस आहे. मात्र, महोत्सवातील



धार्मिक परंपरा आणि सामाजिक उपक्रम पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार आहेत. श्रद्धा, सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधत महोत्सवाची परंपरा जपण्यावर भर देण्यात आला आहे.

याबाबत आमदार किशोर जोरगेवार म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहणा नंतर महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीत शेतकरी बांधवांच्या वेदना आणि अडचणी लक्षात घेणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यामुळे मनोरंजनाचे कार्यक्रम रद्द करून त्या खर्चातून दुष्काळग्रस्त शेतकर्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, माता महाकाली महोत्सवाची धार्मिक परंपरा आणि समाजोपयोगी उपक्रम सुरूच राहतील. मातेच्या आशीर्वादाने भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीची ही परंपरा पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

ध्वजारोहणानंतर चांदीच्या माता महाकाली मूर्तीची विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर मूर्तीची पालखीतून रथापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. भजन-कीर्तनाच्या गजरात आणि वाजतगाजत हा रथ नितीन कुमरवार यांच्या निवासस्थानी नेण्यात आला. यंदा माता महाकालीची चांदीची मूर्ती घरी नेऊन भाविकांना दर्शनाची संधी उपलब्ध करून देण्याचा पहिला मान कुमरवार परिवाराला मिळाला. नवरात्रोत्सवाच्या काळात माता महाकालीच्या चांदीच्या मूर्तीचे घरोघरी दर्शन घडविण्याची परंपरा आहे. त्यानुसार कुमरवार परिवाराच्या निवासस्थानी मूर्ती विराजमान करण्यात आली आहे.

सोमवारी, १२ ऑक्टोबर रोजी नितीन कुमरवार यांच्या निवासस्थानावरून माता महाकालीची मूर्ती वाजत गाजत रामजीवन परमार यांच्या निवासस्थानी नेण्यात येणार आहे. घटस्थापनेच्या दिवशी ५१ फूट उंच ध्वजाचे ध्वजारोहण करून महोत्सवाच्या धार्मिक सोहळ्यांना सुरुवात झाली.

दुष्काळग्रस्त शेतकर्यांप्रती सामाजिक बांधिलकी जपत मनोरंजनाचे कार्यक्रम रद्द करण्यात आले असले, तरी धार्मिक परंपरा आणि समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून माता महाकाली महोत्सवाची वाटचाल सुरू राहणार आहे.

**रद्द झालेले कार्यक्रम...**

१४ ऑक्टोबरपासून नियोजित असलेल्या पाच दिवसीय महोत्सवात सुप्रसिद्ध भक्तिसंगित गायक गजेंद्र प्रताप सिंह, हेमंत ब्रिजवासी, चौतन्य देवढे आणि प्रसिद्ध गायिका जयपिंदर नरुला यांच्या भक्तिमय गायन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन हे सर्व कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**आयोजित कार्यक्रम...**

महोत्सवातील धार्मिक परंपरा आणि सामाजिक उपक्रम मात्र पूर्वनियोजित स्वरूपात सुरू राहणार आहेत. यामध्ये ९९९९ कन्यांचे पूजन व भोजन, सौभाग्यवती महिलांना अखंड सौभाग्याची कामना करत हिरवा चुडा भरून देण्याचा उपक्रम तसेच नवरात्रीदरम्यान जन्मलेल्या कन्यांना चांदीचे नाणे वाटप करण्यात येणार आहे. १९ ऑक्टोबर रोजी नगरप्रदक्षिणाही काढण्यात येणार आहे.

## पाण्याच्या प्रत्येक थेंबावर प्रशासनाची नजर : अनधिकृत उपसा करणाऱ्यांवर कठोर कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर- (धनंजय पांढरे)**

पावसाने पाठ फिरवल्याने जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, आगामी काळात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत जलस्त्रोतांमधील पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा ठरणार आहे. नागरिकांना पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळावे आणि उपलब्ध जलसाठे टिकून राहावेत, यासाठी जिल्हा प्रशासनाने आता कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. जलाशय, नद्या, तलाव, कालवे आणि कोल्हापुरी बंधाऱ्यांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल मंडळनिहाय भरारी पथके स्थापन करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्ष वसुमना पंत यांनी दिले आहेत.

पाण्याची टंचाई निर्माण झाल्यानंतर नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये, यासाठी आतापासूनच उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करणे आवश्यक आहे. कमी पर्जन्यमानामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत पाण्याचा अनिर्बंध वापर भविष्यात गंभीर संकटाला



निमंत्रण देऊ शकतो. त्यामुळे जलस्त्रोतांमधून परवानगीशिवाय पाणी उपसा करणाऱ्यांवर प्रशासनाची करडी नजर राहणार आहे. यासाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून, नियमित तपासण्यांसोबतच अचानक धाडीही टाकल्या जाणार आहेत.

प्रत्येक महसूल मंडळात स्थापन होणाऱ्या भरारी पथकात जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग किंवा जिल्हा परिषदेचे शाखा अभियंता समन्वयक म्हणून काम पाहतील. तसेच महावितरणचे शाखा अभियंता, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी आणि पोलीस उपनिरीक्षक यांचा पथकात समावेश असेल. जलस्त्रोतांमधून अनधिकृतपणे पाणी उपसा होत असल्याचे आढळल्यास संबंधित मोटारी, पंप, पाइपलाइन आणि इतर साधनसामग्रीची तपासणी करून ती जप्त करण्याची कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांकडून तक्रार प्राप्त होताच संबंधित ठिकाणी तातडीने तपासणी केली जाणार आहे.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा अपव्यय रोखणे आणि उपलब्ध साठ्याचे संरक्षण करणे ही काळाची गरज बनली आहे. भविष्यात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना संकटाचा सामना करावा लागू नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. भरारी पथकांनी केलेल्या तपासण्या, आढळलेला अनधिकृत पाणी उपसा आणि त्यावर करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल दर सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावा, असेही आदेश देण्यात आले आहेत.

पाण्याची प्रत्येक टंचाई ही सर्वसामान्यांच्या जीवनावर परिणाम करणारी असते. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचे संरक्षण करून नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या गरजेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार प्रशासनाने केला आहे. अनधिकृत पाणी उपशामुळे भविष्यात नागरिकांना पाण्याच्या संकटाला सामोरे जावे लागू नये, यासाठी कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिला आहे.

### थोडक्यात

## वन कंत्राटी मजुरांना न्याय मिळणार : आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे आश्वासन

**भाजपा कामगार मोर्चाची उपवनसंरक्षक यांच्यासोबत यशस्वी चर्चा**



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे )**

वन विभागाच्या वाहतूक आणि विपणन विभाग, बल्लारशाह येथील कंत्राटी कामगारांनी त्यांच्या चार महिन्यांच्या प्रलंबित वेतन आणि इतर सुविधांसाठी भाजपा कामगार मोर्चाचे प्रदेश महासचिव अजय दुबे यांची भेट घेतली. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन अजय दुबे यांनी तातडीने माजी कॅबिनेट मंत्री आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांना दूरध्वनीवरून माहिती दिली. त्यावर आमदारांनी आश्वस्त केले की कामगारांना नक्कीच न्याय मिळेल आणि त्यासाठी सर्वतोपरी सहकार्य व प्रयत्न केले जातील.

कंत्राटी वनमजुरांच्या प्रश्नांवर आज भाजपा कामगार मोचार्चे प्रदेश महासचिव अजय दुबे यांची उपवनसंरक्षक अविनाश कुमार यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली. त्यांनी सांगितले की सर्व मजुरांच्या थकीत वेतनाबाबत शासन स्तरावर सतत पत्रव्यवहार सुरू आहे. तसेच भविष्य निर्वाह निधी, ESIC आणि साप्ताहिक सुट्टीबाबत येत असलेल्या तक्रारींची चौकशी केली जाईल. विभागातील माथाडी कामगारांच्या मानवी आणि सुरक्षा विषयक सर्व गरजा पूर्ण केल्या जातील.

उल्लेखनीय आहे की, विभागाच्या बल्लारशाह आणि आलापल्ली मिळून शेकडो कामगारांचे वेतन जवळपास पाच महिन्यांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे त्यांच्यासमोर उदरनिवार्हाचा प्रश्न निर्माण झाला आहे. बल्लारशाह आणि आलापल्ली येथील कंत्राटी वनमजूर गेल्या एक आठवड्यापासून कामबंद संपावर आहेत. यापैकी यशस्वी चर्चेनंतर बल्लारशाहच्या मजुरांनी कामावर परतण्याचा निर्णय घेतला आहे. या बैठकीला भाजपा कामगार मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष शेख करीम आणि राम मिलन यादव हे प्रमुख उपस्थित होते.

## पिंटू बंडू काटवले हरवले आहे

**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

कामठी तालुक्यातील आजनी येथील रहिवासी आणि गावातील शेतकरी लक्ष्मण हरणे यांचेकडे नोकरीला असलेले पिंटू बंडू



काटवले ( वय ४२ वर्ष ) हे बुधवार दिनांक ७ ऑक्टोबर पासून घरी कुणालाही न सांगता निघून गेले आहेत. घरच्यांनी सर्व मित्र आणि नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र, त्यांचा कुठेच पत्ता न लागल्याने शेवटी घरच्या मंडळींनी कामठी पोलिस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली आहे.

सदर व्यक्तीने गळ्यात भगवा दुपट्टा आणि पांढरा शर्ट परिधान केलेला आहे. वर्ण निमगोरा आहे. संबंधित व्यक्ती कुणाला आढळून आल्यास कामठी पोलिस ठाणे किंवा खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क : सौ. कविता पिंटू काटवले- ७३९१८१४१४७**

## राजुरा-बल्लारपूर मार्गावर ट्रकच्या धडकेत २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू



**दै. सिंहवाणी वृत्त, राजुरा :-(धनंजय पांढरे)**

राजुरा ते बल्लारपूर मार्गावरील पुलाजवळ आज सायंकाळच्या सुमारास ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात आवाळपूर, ता. कोरपना येथील २४ वर्षीय आदर्श कैलास राठोड याचा मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच राजुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी युवकाला तातडीने उपजिल्हा रुग्णालय, राजुरा येथे दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. मिळालेल्या माहितीनुसार, रेल्वे साइडिंगवर लोहखनिज खाली करून परत येणारा ट्रक क्रमांक एमएच ३३ टी ३९५२ राजुरा-बल्लारपूर मागार्ने जात होता. दरम्यान, पुलाजवळ ट्रकची दुचाकी क्रमांक एमएच ३४ एटी ८३१४ ला जोरदार धडक बसली.

या धडकेत दुचाकीस्वार आदर्श कैलास राठोड गंभीर जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून त्याला उपचारासाठी रुग्णालयात हलविले; मात्र त्याचा जीव वाचू शकला नाही. या अपघातामुळे राजुरा-बल्लारपूर मार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. परिणामी, मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली आणि वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला.अपघाताच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, अवघ्या २४ वर्षांच्या आदर्शच्या मृत्यूमुळे आवाळपूर येथे शोककळा पसरली आहे. या अपघाताची नोंद घेऊन राजुरा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## भरधाव ट्रक-ऑटोरिक्षाची धडक, एक ठार, १ जखमी

**माळाकोळी :** भरधाव वेगातील ट्रकने ऑटोरिक्षाला जबर धडक दिली. या अपघातात एक जण ठार झाला तर महिला गंभीर जखमी झाली. सदर अपघात माळाकोळीजवळ मंगळवारी दुपारी झाला. नांदेड -लातूर राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ वर अहमदपूर कडून लोह्याकडे जाणारा आयशर क्रं एमएच १३ डीक्यु ७०३९ आणि ऑटो क्रं एमएच २६ एसी ०२३५ या दोन वाहनांचा माळाकोळी कार्नरजवळ मंगळवारी सकाळी ११ वाजता अपघात झाला. यात गंभीर जखमी नामदेव माधवराव केंद्रे (वय ५५) रा. नगारवाडी याचा दवाखान्यात पोहोचण्यापूर्वीच मृत्यू झाला. तर शोभाबाई चुडामन वाघमारे (वय ६०) रा. माळाकोळी या गंभीर जखमी झाले आहेत त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालय लोहा येथे उपचार करून पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय विष्णुपुरी येथे पाठवण्यात आले.

थोडक्यात

## भिवापूर येथील विशाल महाशिवलिंग मंदिरात धनोजे कुणबी समाजाच्यावतीने भजन संध्या व अभिषेक

### आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून दर सोमवारी विविध समाज व संस्थांच्यावतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर :-(धनंजय पांढरे)**
आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून लालपेठ कॉलरी परिसरातील महाराष्ट्रातील पुरातन व विशाल महाशिवलिंग मंदिरात दर सोमवारी विविध समाज, समाजसेवी संस्था आणि धार्मिक संस्थांच्या वतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत यावेळी धनोजे कुणबी समाज, चंद्रपूर यांच्या वतीने भजन संध्या, अभिषेक, आरती आणि प्रसाद वितरण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी, उत्तम आरोग्यासाठी तसेच चंद्रपूर शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी भगवान महादेवाच्या चरणी प्रार्थना केली. भजन संध्या आणि आरतीमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने या धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला.
विशाल महाशिवलिंग मंदिर हे श्रद्धा, भक्ती आणि आध्यात्मिक ऊर्जेचे महत्त्वपूर्ण केंद्र असून, या ठिकाणी विविध समाज आणि संस्थांना धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सहभागी होण्याची संधी मिळावी, या उद्देशाने आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. दर सोमवारी आयोजित होणाऱ्या या कार्यक्रमांमुळे विविध समाजांना धार्मिक परंपरा जपण्यासोबतच सामूहिक भक्तीचा अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होत आहे. या कार्यक्रमाचे यजमानपद धनोजे कुणबी समाज, चंद्रपूरचे अध्यक्ष श्रीधर मालेकर यांनी भूषविले. यावेळी विशाल महाशिवलिंग सेवा समिती, लालपेठ, चंद्रपूरचे पदाधिकारी, धनोजे कुणबी समाजाचे सदस्य, भाविक आणि आयोजक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

## संजय ऐलवाड यांच्या झिब्राला बालसाहित्य पुरस्कार जाहीर

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**
निर्मला मठपती फाऊंडेशन, सोलापूर या संस्थेच्या वतीने देण्यात येणारा बालसाहित्य पुरस्कार प्रसिद्ध बालसाहित्यिक तथा अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे कोषाध्यक्ष लेखक संजय ऐलवाड यांच्या बहुचर्चित "झिब्रा" कादंबरीला जाहीर




झाला असल्याचे निर्मला मठपती फाऊंडेशनच्या अध्यक्षा शिवांजली स्वामी यांनी सांगितले. सोलापूर येथील निर्मला मठपती फाऊंडेशनच्यावतीने दरवर्षी नवीन प्रकाशित होणाऱ्या विविध विभागातील साहित्य कृतींना उत्कृष्ट साहित्य पुरस्कार दिले जातात. यावर्षी बाल साहित्य विभागात लेखक संजय ऐलवाड लिखित झिब्रा या बालकादंबरीला उत्कृष्ट साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.
रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप असून सोलापूर विद्यापीठातील मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता तथा भाषा वाङमय संकुलचे संचालक डॉ. महेश खरात यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. तसेच डॉ. श्रुती पानसे, वडगबाळकर आणि पद्माकर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६, रोजी दुपारी ३.३० वाजता शिवस्मारक, शिंदे चौक सोलापूर येथे हा कार्यक्रम संपन्न होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. झिब्राच्या कथा या कथासंग्रहाच्या रूपात सुरुवातीला झिब्रा ही बालनायिका वाचकांसमोर आली. झिब्रा हे पात्र विकसित करून लेखकाने बाल वाचकांच्या आग्रहास्तव कथेतील नायिका कादंबरीतून नव्या शैलीतून मांडली आहे. उत्कृष्ट कथानक, साधी सोपी भाषा शैली आणि त्यातून दिलेली पर्यावरणाची शिकवण हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे ही कादंबरी महाराष्ट्रभर चर्चेत आहे. बाल साहित्यिक संजय ऐलवाड यांना जाहीर झालेल्या या पुरस्काराबद्दल साहित्य क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## वसतिगृह, आधार व स्वयंम योजनांसाठी ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

### विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्जाची सुविधा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३० ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. ऑनलाईन पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे अर्ज सादर करता न आलेल्या विद्यार्थ्यांना आता ऑफलाईन पद्धतीने अर्ज करता येणार आहे. शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांना अर्ज भरता येत नव्हते. या पार्श्वभूमीवर विभागाच्या बैठकीत ऑनलाईन प्रक्रिया सुरळीत होईपर्यंत ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला.
त्यानुसार, बारावीनंतर पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना वसतिगृह, आधार व स्वयंम योजनांसाठी ऑफलाईन अर्ज करता येणार आहे. विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात अर्ज भरून त्याची प्रत आणि आवश्यक कागदपत्रे संबंधित वसतिगृह किंवा कार्यालयात जमा करावीत.

# नायगावजवळ २४ वर्षीय तरुणीचा संशयास्पद मृत्यू, अपहरण करून खून केल्याचा संशय !

## डोक्याला गंभीर दुखापत, उपचारादरम्यान मृत्यू, ऑटोचालक पोलिसांच्या ताब्यात, सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील जलालखेडा येथील २४ वर्षीय तरुणीचा जलालखेडा-काटोल मार्गावरील नायगावजवळ संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि. १३ ऑक्टोबर) सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास उघडकीस आली. शीतल सुभाष चरपे (वय २४, रा. जलालखेडा) असे मृत तरुणीचे नाव आहे. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती आणि मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. तिला उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, जलालखेडा येथे दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.
या घटनेमुळे जलालखेडा परिसरात खळबळ उडाली असून, तरुणीचा अपघात झाला की तिचे अपहरण करून खून करण्यात आला, या दिशेने पोलिस तपास करीत आहेत.
मिळालेल्या माहितीनुसार, जलालखेडा ते काटोल मार्गाने प्रवास करणाऱ्या काही युवकांना नायगाव गावाजवळ शीतल गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यावर पडलेली दिसली. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे तसेच मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. प्रसंगाचे गांभीर्य ओळखून



युवकांनी तिला तातडीने जलालखेडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी तिच्यावर प्राथमिक उपचार केले; मात्र तिची प्रकृती गंभीर असल्याने उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.
घटनेची माहिती मिळताच जलालखेडा पोलिस ठाण्याचे ठाणेदार विनोद जांभळे व पोलिस कर्मचारी तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झाले. त्यांनी घटनेची माहिती घेतल्यानंतर घटनास्थळाची पाहणी केली. घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपासाला सुरुवात करण्यात आली आहे.

### अपघात की घातपात? परिसरात चर्चेला उधाण

शीतल चरपे हिचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. मात्र, घटनास्थळावरील परिस्थिती आणि इतर बाबींमुळे हा केवळ अपघात नसून घातपात असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शीतल या मार्गावर कोणत्या कारणासाठी गेली होती, याचाही पोलिसांकडून तपास केला जात आहे. तिच्याजवळ असलेली बॅग आणि त्यातील साहित्य व्यवस्थित असल्याचे सांगण्यात येत आहे. अपघाताच्या शक्यतेसह या सर्व बाबींची पोलिसांकडून पडताळणी केली जात आहे.

### ऑटोचालक ताब्यात; सीसीटीव्ही फुटेजची तपासणी

या प्रकरणाच्या तपासाला गती देत जलालखेडा पोलिसांनी एका ऑटोचालकाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे. नायगाव परिसरासह संबंधित मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात आहे. शीतल घटनास्थळी कशी पोहोचली, तिच्यासोबत कोणी होते का आणि तिच्या मृत्यूमागे नेमके काय कारण आहे, याचा शोध पोलिस घेत आहेत.
या घटनेमागील सत्य उघड करण्याचे आव्हान पोलिसांसमोर असून, तपासातून महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, शीतलच्या मृत्यूमागील नेमके कारण शवविच्छेदन अहवाल आणि पोलिस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे हा अपघात आहे की घातपात, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# पीक नोंद सातबाऱ्यावर नसल्याने शेतकरी अडचणीत, शेतमाल विक्रीची चिंता

## सुधीर पारवे यांची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
पीक पाहणी करून तलाठी स्तरावर मान्यता मिळाली, तरी सातबारा उताऱ्यावर पिकांची नोंद नसल्याने शेतकऱ्यांची शेतमाल विक्रीची प्रक्रिया अडचणीत आली आहे. उमरेड, भिवापूर आणि कुही तालुक्यांतील शेतकऱ्यांना खरेदी-विक्री संस्थांकडे तसेच संबंधित महामंडळाकडे नोंदणी करून विक्रीसाठी क्रमांक लावता येत नसल्याने आर्थिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. ही तांत्रिक अडचण तातडीने दूर करून शेतकऱ्यांना पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी माजी आमदार सुधीर पारवे यांनी केली आहे.
शेतकऱ्यांनी डी.सी.एस. एम.एच.



ॲपच्या माध्यमातून शेतातील पिकांची पीक पाहणी नोंदणी पूर्ण केली आहे. तलाठी स्तरावर या नोंदींची तपासणी करून मान्यताही देण्यात आली आहे. मात्र, मान्यता मिळून १५ ते २० दिवस उलटूनही पिकांच्या नोंदी सातबारा उताऱ्यावर दिसत नसल्याने शेतकऱ्यांना प्रशासकीय अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे.

### नोंदणीअभावी शेतमाल विक्री रखडली

सातबारा उताऱ्यावर पिकांची नोंद उपलब्ध नसल्याने शेतमाल विक्रीसाठी आवश्यक असलेली नोंदणी प्रक्रिया पूर्ण करता येत नाही. त्यामुळे शेतमाल विक्रीसाठी खरेदी-विक्री संस्थांकडे आणि संबंधित महामंडळाकडे नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. पीक पाहणीची प्रक्रिया पूर्ण करूनही केवळ सातबारा अद्ययावत नसल्यामुळे शेतकऱ्यांना विक्रीच्या प्रक्रियेपासून वंचित राहण्याची वेळ येत आहे.

### हंगाम हातातून जाण्याची भीती

नोंदी अद्ययावत होण्यास विलंब झाल्यास शेतमाल विक्रीचा हंगाम निघून जाण्याची शक्यता आहे. वेळेत विक्री करता न आल्यास शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागू शकते. पीक पाहणी आणि तलाठी स्तरावरील मान्यता पूर्ण असतानाही तांत्रिक अडचणीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.
सातबारा उताऱ्यावरील पीक नोंदी अद्ययावत होईपर्यंत ॲपवरील पीक पाहणी आणि तलाठी स्तरावरील मान्यतेच्या आधारे शेतमाल विक्रीसाठी नोंदणी करण्याची पर्यायी सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी सुधीर पारवे यांनी उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण तसेच उमरेड, भिवापूर आणि कुही येथील तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## उमेद अभियानच्या अनेक समस्यांचे महाराष्ट्र मुख्यमंत्रीच्या मुख्य सचिवांना आयटक प्रतिनिधि मंडळाचे निवेदन




**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**
महाराष्ट्र मुख्यमंत्रीच्या मुख्य सचिव निलम प्रधान यांच्याशी आयटक प्रतिनिधि मंडळाने भेट घेत उमेद अभियानच्या अनेक समस्यांचे निवेदन पत्र आयटक चे महाराष्ट्र महासचिव श्याम काळे यांच्या नेतृत्वात सोमवार (ता. १२ ऑक्टोबर) ला दिले. याप्रसंगी जिल्हा अध्यक्ष ज्योति अंडरसहारे, जिल्हा सचिव मीनल सोमकुंवर, जिल्हा संगठक संजय बिझाडे, कविता मेश्राम, दिपाली मेश्राम,मौदा तहसील अध्यक्ष मीनाक्षी डहाके, सचिव निशा वैद्य, सावनेर तहसील अध्यक्ष काजल लांजेवार, काटोल च्या प्रविणा खोब्रागडे, मौदा उपाध्यक्ष काजल वानखेडे, पदाधिकारीगण सुजाता कडु, बिझाडे उपस्थित होते. निवेदन देण्यापूर्वी शेकडो उमेद च्या महिला कॅडर यांनी संविधान चौकात मोर्चा आंदोलन करून ४ तास धरणे दिले. याला पाहता शासनाने पोलीस व्हॅन पाठवून प्रतिनिधी मंडळ यांना बोलावून त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या.
आयटक पदाधिकारी महिला व शाम काळे यांनी सांगितले की, वेळेवर त्यांच्या समस्यांचे समाधान न झाल्यास जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलन तीव्र आणि क्रांतिकारी जेलभरो आंदोलन करण्यात येईल. याप्रसंगी आंदोलनात मौदा तालुक्याच्या गावा-गावातील आयटक पदाधिकारी महिला स्वाती डोरले, मंगला वासनिक, किरण बावने, पोर्णिमा सत्वालख, शिल्पा ठाकरे, सपना वकालकर, प्रांजली भुते, प्रियंका हटवार, निकिता लोहबरे, अनिता मिरासे, शारदा मसके, भारती तांडेकर, राजकुमारी कळवाह, देवका भारती, सोनवाने, तांडेकर,पोर्णिमा उकेटोने, प्रतिमा कुंडकार, जोसिका हटवार, वनिता पाटिल, प्राज्कता चौहान, उषा वाडिभस्मे, संगीता मानकर,कोमल वैद्य, भावना सांडेल, हीरा चकोले, सीमा अड़कने, माधुरी सोनवाने, दीक्षा चटप, ज्योत्सना ढोके, रोशना गभने, लता मेश्राम, संगीता कुसतकर, ज्योति मेश्राम, अश्विनी मलवे, रूपाली डफर, शुंभागी बांगर, विमल उइके, वनिता पाटील,रिना गोलाईत, दुर्गा आगे, वर्षा सिरसाम, चंद्रभागा कंगाले, प्रतिभा तितरमारे, आशा पडोले, सविता वैद्य, कविता कारेमोरे सह जिल्ह्यातील आयटक पदाधिकारी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## माजी सैनिकांसाठी १६ ऑक्टोबरला सुरेश भट सभागृहात विशेष रोजगार मेळावा

### कॉर्पोरेट व औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा तसेच त्यांच्या अवलंबितांना नागरी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुनर्वसन महासंचालनालयाच्या (डीजीआर) वतीने शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी नागपुरात विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.
सकाळी ७ वाजतापासून रेशीमबाग येथील सुरेश भट सभागृहात हा मेळावा होणार आहे.
संरक्षण मंत्रालयाच्या माजी सैनिक कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या पुनर्वसन महासंचालनालयाच्या वतीने माजी सैनिकांचे पुनर्वसन आणि त्यांना नागरी कार्यक्षेत्रात सक्षम करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या रोजगार मेळाव्यात भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलातील माजी सैनिकांना कॉर्पोरेट तसेच औद्योगिक क्षेत्रातील प्रमुख नियोक्त्यांशी संवाद साधण्याची आणि रोजगाराच्या संधी मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सुरक्षा, माहिती तंत्रज्ञान (आयटी), प्रशासन, लॉजिस्टिक्स, आरोग्यसेवा आणि अभियांत्रिकी यांसह विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी या मेळाव्याच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहेत.
याशिवाय, माजी सैनिकांच्या सोयीसाठी स्पर्श आणि इच्स यांचे स्वतंत्र स्टॉलही उभारण्यात येणार आहेत. या स्टॉल्च्या माध्यमातून स्पर्श आणि इच्स संदर्भातील माजी सैनिकांच्या अडचणी व समस्यांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन आणि आवश्यक सहकार्य करण्यात येणार आहे.

# कृषिपंपांच्या सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण प्रत्येक जिल्ह्यात 'मिशन मोड'वर

## नादुरुस्त रोहित्रे तातडीने बदला : अध्यक्ष लोकेश चंद्र यांचे आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
दुष्काळी परिस्थितीत राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात १ हजार नवीन वितरण रोहित्र व स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर तसेच कॅपॅसिटर बँक बसविण्यासाठी जिल्हानिहाय २० कोटींच्या निधीस मंजुरी दिली आहे. या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सोमवारी (दि. १२) सर्व जिल्ह्यांचा आढावा घेतला आणि ही सर्व कामे 'मिशन मोड'वर पूर्ण करण्याचे आदेश दिले.




मुंबई येथील प्रकाशगड मुख्यालयात आयोजित बैठकीमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी प्रत्येक जिल्ह्यातील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके बुधवार (दि. १४) पर्यंत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्याचे आदेश दिले. या निधीमधून होणाऱ्या वीजयंत्रणेच्या सक्षमीकरणाच्या कामात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही तसेच नादुरुस्त किंवा बंद पडलेले रोहित्र तातडीने बदलण्यात यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी संचालक धनंजय औंढेकर (संचालन), अनुदीप दिघे (वित्त), योगेश गडकरी (वाणिज्य), सचिन तालेवार (प्रकल्प),राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह कार्यकारी संचालक तसेच सर्व क्षेत्रीय मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते उपस्थित होते.
मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने कृषिपंपांना आणि कृषी वीजवाहिन्यांवरील घरगुती ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी २० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून आवश्यकतेनुसार विद्यमान ६३ केव्हीएऐवजी १०० केव्हीए क्षमतेचे तसेच अतिरिक्त सिंगल पोल रोहित्र उभारण्यात येणार आहे. यासोबतच कृषी वाहिनीवरील घरगुती ग्राहकांना २४ तास वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी 'स्पेशल डिझाईन रोहित्रे' (एसडीटी) बसविण्यात येणार आहेत. तर योग्य दाबाने व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उपकेंद्रांमध्ये आणि वीज वाहिन्यांवर आवश्यकतेनुसार नवीन कॅपॅसिटर बँक्स बसविण्यात येणार आहेत.
विशेष निधीमधील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके संबंधित अधीक्षक अभियंत्यांनी दि. १४ ऑक्टोबरपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करावेत. दुष्काळी परिस्थितीत रोहित्र बिघाड व इतर तातडीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी २४ तास सुरु असणारी स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्याचे निर्देश यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले.
राज्य शासनाच्या विशेष निधीमधून केवळ कृषीपंपांचा आणि कृषी वाहिन्यांवरील घरगुती ग्राहकांचा वीजपुरवठा सक्षम करण्यासाठीच कामे प्रस्तावित करावीत. या निधीचा अन्यत्र वापर करू नये असे संचालक (संचलन) धनंजय औंढेकर यांनी स्पष्ट केले. चालू रब्बी हंगामातच शेतकऱ्यांना सुरळीत व दर्जेदार वीज मिळेल यासाठी ही कामे निर्धारित गुणवत्ता व तांत्रिक मानकांचे तंतोतंत पालन करून वेळेत पूर्ण करा असे निर्देश त्यांनी दिले. याबाबत मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक क्षेत्रीय कार्यालयांना यापूर्वीच निर्गमित करण्यात आल्याचे संचालक धनंजय औंढेकर यांनी यावेळी सांगितले.

थोडक्यात

## संलगटोला (सोनपुरी) येथे वर्षभरापासून जलपुरवठा योजना बंद

### पाण्याची टाकी शोभेची वस्तू, थेंबभर पाण्यासाठी ग्रामस्थ त्रस्त

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

संलगटोला (सोनपुरी) येथे गेल्या सुमारे एक वर्षापासून ग्रामीण जलपुरवठा व्यवस्था बंद असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला



सामोरे जावे लागत आहे. गावात पाण्याची टाकी आणि जलपुरवठ्याची व्यवस्था असतानाही त्याचा लाभ ग्रामस्थांना मिळत नसल्याचे चित्र आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गेल्या दीर्घ काळापासून नळाद्वारे होणारा पाणीपुरवठा बंद आहे. त्यामुळे नागरिकांना दूरवरच्या जलस्त्रोतांमधून पाणी आणावे लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

**वर्षभरापासून व्यवस्था बंद; जबाबदारांचे लक्ष कधी?**

जलपुरवठा योजनेवर लाखो रुपये खर्च करण्यात आले असताना तिचे संचालनच होत नसेल, तर या योजनेचा उद्देश काय? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. वर्षभरापासून बंद असलेल्या जलपुरवठा व्यवस्थेमुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे. ग्रामस्थांनी संबंधित जलपुरवठा विभागाने तातडीने पाणीपुरवठा सुरू करावा, बंद पडलेल्या यंत्रणेची तांत्रिक तपासणी करावी आणि आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे.

**ग्रामस्थांचा सवाल—नियमित पाणीपुरवठा अखेर कधी सुरू होणार?**

उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याची समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीयार्ने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. पिण्याच्या पाण्यासारखी मूलभूत सुविधा तब्बल एक वर्ष बंद राहणे ही चिंतेची बाब असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. संलगटोला येथे नियमित व सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तातडीने पूर्ववत करावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## पूर्व विदर्भातील सहाही जिल्ह्यात 'एआय डिस्ट्रिक्ट हब' स्थापन करणार!

### गडचिरोतील सभेत काँग्रेस उमेदवार अभिजीत वंजारी यांची घोषणा




**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल आणि दुर्गम जिल्ह्यातील पदवीधर युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी गडचिरोलीसह पूर्व विदर्भातील सहाही जिल्ह्यात एआय डिस्ट्रिक्ट हबची स्थापना करण्यावर आपण भर देणार आहोत, असे प्रतिपादन नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे काँग्रेस व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आमदार ॲड. अभिजित वंजारी यांनी केले. पदवीधरांच्या कौशल्यविकासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत त्यांना रोजगारक्षम बनविणे, हेसुद्धा आपले मिशन असल्याचे त्यांनी गडचिरोली येथे आयोजित आढावा बैठकीत सांगितले.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट), विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ (विमाशि) तसेच विविध शिक्षक व कर्मचारी संघटना, महाविकास आघाडीच्या वतीने अभिजित वंजारी निवडणूक रिंगणात आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली येथे आयोजित सभेत संघटनात्मक तयारी, कार्यकर्त्यांशी संवाद आणि आगामी प्रचाराचे नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. पदवीधरांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि व्यावसायिक प्रगतीसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने डॉ. श्रीकांत जिचकार पदवीधर भवन उभारण्याचा मुद्दाही महत्त्वाचा आहे. पदवीधरांना मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षांची तयारी, विविध उपक्रम आणि संघटनात्मक संवादासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या दृष्टीने पदवीधर भवनाची संकल्पना उपयुक्त ठरणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्यविकास आणि आवश्यक शैक्षणिक सुविधांच्या माध्यमातून पदवीधरांना प्रगतीच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यावर वंजारी यांनी भर दिला. या सभेला नागपूर विभागाचे शिक्षक आमदार सुधाकर अडबाले, माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव दुष्यंत किरसान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष अतुल पवार, गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष प्रकाश इतकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते संजय ठाकरे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोशिम, प्राचार्य समशेर खान पठाण आणि प्राचार्य मनोहर पाटील पोरेडी यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रभावी संपर्कयंत्रणा उभारणे, शिक्षक व कर्मचारी संघटनांशी समन्वय वाढविणे आणि महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी एकजुटीने निवडणुकीच्या कामाला लागणे, यावर भर देण्यात आला. गडचिरोली जिल्ह्यातील पदवीधरांच्या अपेक्षा आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन निवडणूक प्रचाराची दिशा ठरविण्याबाबतही चर्चा झाली.

# धम्मचक्र प्रवर्तन दिन समारंभासाठी मनपाची यंत्रणा सज्ज

### दीक्षाभूमीतील नागरी सुविधांची आयुक्तांकडून पाहणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

येत्या २० ऑक्टोबरला होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिन मुख्य समारंभ आणि इतर दिवशी देखील दीक्षाभूमीवर दाखल होणाऱ्या बौद्ध अनुयायांसाठी नागरी सुविधा आणि आरोग्याच्या दृष्टीने संपूर्ण दीक्षाभूमी परिसरामध्ये स्वच्छतेसह नागरी सुविधा पुरविण्याला प्राधान्य द्या, असे निर्देश मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले. धम्मचक्रप्रवर्तन दिनानिमित्त मनपाच्यावतीने करण्यात येत असलेल्या व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन यांनी मंगळवार (ता.१३) रोजी दीक्षाभूमी परिसराला भेट दिली. यावेळी नागपूर महानगरपालिका तसेच जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, समाज कल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

येत्या २० ऑक्टोबरला धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा होणार आहे. यासाठी विविध राज्यांतून येणार्या अनुयायांसाठी दीक्षाभूमी परिसरात, पीकेव्ही, आयटीआय व कुर्वेज हायस्कूलमध्ये केलेल्या नागरी सुविधांच्या व्यवस्थेची पाहणी करण्यात आली. याशिवाय वैद्यकीय व्यवस्था व परिवहन व्यवस्था सुद्धा मनपाद्वारे उपलब्ध केली जाणार आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, पोलीस उपायुक्त ऋषीकेश रेड्डी, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, मुख्य अभियंता लिना उपाध्ये, उपायुक्त राजेश भगत, अधीक्षक अभियंता विजय गुरुबक्षानी, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालक सुकेशनी तेलगोटे, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर, सहाय्यक आयुक्त धनंजय जाधव, मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, परिवहन विभागाचे प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, कार्यकारी अभियंता राजेंद्र राठोड, प्रकल्प अभियंता राजीव गौतम, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, तसेच झोनल स्वच्छता अधिकारी ऋषिकेश इंगळे उपस्थित होते.

येत्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त लाखो बौद्ध अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दीक्षाभूमीवर येणार आहेत. त्यानुसार १८ ऑक्टोंबर ते २१ ऑक्टोंबर या कालावधीमध्ये नागपूर महानगरपालिकेच्या वतीने दीक्षाभूमीवर अनुयायांसाठी आवश्यक त्यासर्व नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. संपूर्ण दीक्षाभूमी परिसरामध्ये स्वच्छतेला विशेष प्राधान्य देण्याबाबत मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी प्रशासनाला निर्देश दिले.

यावेळी आयुक्त यांनी इतर अधिकाऱ्यांसोबत दीक्षाभूमीचा संपूर्ण परिसर, मुख्य समारंभाचे ठिकाण, डॉ. आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च येथील इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या जागेत तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था, माता कचेरी सार्वजनिक आरोग्य विभाग परिसर आणि शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र (आयटीआय), मध्यवर्ती कारागृह व अन्य नागरी सुविधा या सर्व व्यवस्थेची पाहणी केली. दीक्षाभूमी स्तूप, तसेच सर्व मार्ग आणि शौचालयांच्या ठिकाणी वीज पुरवठा निरंतर सुरू राहील याकडे कटाक्षाने लक्ष देणे तसेच



प्रसाधनगृहांमध्ये वीज पुरवठ्यासोबतच निरंतर पाणी पुरवठा देखील ठेवणे आणि सर्व शौचालयांच्या ठिकाणी स्वच्छतेसाठी हँडवॉशची व्यवस्था करण्याचे निर्देश मनपा आयुक्तांनी दिले.

**अनुयायांसाठी वॉटर प्रुफ डोमची व्यवस्था**

अनुयायांना राहण्यासाठी यावर्षी शहरातील विविध भागांमध्ये नागरी सुविधांसह २१ डोम उभारण्यात आले आहेत. हे सर्व डोम वॉटर प्रुफ राहणार आहेत. जिल्हा प्रशासन व सामाजिक न्याय व सहाय्य विभागाच्या मदतीने हे डोम उभारण्यात आले आहेत. यात दीक्षाभूमी परिसरात ५ डोम राहणार आहेत. याशिवाय या परिसरातील पीकेव्हीचा पदव्युत्तर वसतिगृह येथे ६ डोमची व्यवस्था राहणार आहे, तसेच कुर्वेज हायस्कूलमध्ये ४ डोममध्ये अनुयायांना मुक्काम करता येणार आहे. याशिवाय शासकीय आयटीआय भवन, जिल्हा मलेरिया कार्यालय, उंटखाना, अंबाझरी, बेझनबागमध्ये व ड्रॅगन पॅलेस सुद्धा १-१ डोम उभारण्यात आलेले आहेत. यात एका डोममध्ये प्रत्येकी १ हजार व्यक्तींच्या निवाऱ्याची व्यवस्था होणार आहे. यासोबत सामाजिक न्याय व सहाय्य विभाग, विदर्भ वैधानिक विकास महामंडळच्या इमारतीच्या तळ माळ्यावर अनुयायांची राहण्याची व्यवस्था जिल्हा प्रशासन व सामाजिक न्याय व सहाय्य विभाग द्वारा करण्यात आली आहे.

**१२०० स्वच्छता गृहांची उभारणी**

ज्या ठिकाणी निवार्यांची व्यवस्था केलेली आहे. त्याच परिसरच्या जवळपास तातुरती स्वच्छता गृहे उभारण्यात आली आहेत. परिसरातील विविध भागात १२३५ स्वच्छता गृहे मनपाने उभारली आहेत. प्रत्येक स्वच्छता गृहाच्या ठिकाणी हात पाय धुण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दरवर्षी होणाऱ्या या कार्यक्रमासाठी कायम स्वरुपाची स्वच्छता गृहांची उभारणी करण्याचा प्रयत्न असल्याचे आयुक्त डॉ. विपीन यांनी सांगितले. त्याचप्रमाणे मनपातर्फे याठिकाणी पाणी पुरवठा केला जाणार आहे. या सर्व व्यवस्था आता अंतिम टप्प्यात असून येत्या दोन दिवसात नागरी सुविधांची व्यवस्था पूर्ण होईल, असेही डॉ. विपीन यांनी सांगितले.

**पिण्याचे पाण्याची व्यवस्था**

क्रिपलानी चौक ते लक्ष्मीनगर चौक, दिक्षभूमी चौक ते काचीपुरा चौक या रस्त्यावर १२० पिण्याचे पाणीचे नळ द्वारा नागपूर महानगरपालिका तर्फे पिण्याचे पाणी अनुयायांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**स्नानगृह**

बरेच अनुयायी सकाळी उठून अंबाझरी तलाव कडे स्नान करण्यासाठी जात असतात. अंबाझरी तलावाच्या पायथ्याशी दक्षिण व उत्तर दिशेला तसेच आय टी आय परिसरातील व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिसरात महिला व पुरुषाकरिता वेगवेगळे ५०-५० स्नानगृह करण्यात येत आहे

## ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीसह डिजिटल साक्षरतेवर भर

### सामाजिक न्याय भवनात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा, सामाजिक कार्य करणाऱ्या ज्येष्ठांचा सन्मान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांचे जीवन सुसह्य व्हावे आणि त्यांना आधुनिक डिजिटल सुविधांचा वापर करता यावा, या उद्देशाने सामाजिक न्याय भवन, नागपूर येथे १ ऑक्टोबर रोजी जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर, डिजिटल साक्षरता कार्यक्रम तसेच सामाजिक कार्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा व संस्थांच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, जिल्हा परिषद नागपूरचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुखदेव कौरती, ज्येष्ठ नागरिक श्रीराम बांधे, सुरेश भुजाडे, काशिनाथ धांडे, भावना ठाकर, देवराव सवाईथुल तसेच ज्येष्ठ नागरिक कक्षाचे सदस्य उपस्थित होते.

**विविध आरोग्य तपासण्या मोफत**

'सेवा संकल्प अभियानांतर्गत' आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात नागपूर जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय आणि महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिरात रक्तदाब, रक्तातील साखर, बीएमआय (शरीर वस्तुमान निर्देशांक), हिमोग्लोबिन, थायरॉइड, ईसीजी तसेच सामान्य वैद्यकीय तपासणी अशा विविध आरोग्य सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. वैद्यकीय पथकाने उपस्थितांना आरोग्यविषयक मार्गदर्शनही केले.

**डिजिटल साक्षरतेतून आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख**

आजच्या डिजिटल युगात ज्येष्ठ नागरिकांना विविध डिजिटल सुविधांचा वापर करता यावा, या उद्देशाने डिजिटल साक्षरता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या माध्यमातून त्यांना डिजिटल तंत्रज्ञानाविषयी माहिती देण्यात आली. आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शनाचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांसह स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

**ज्येष्ठांच्या सामाजिक कार्याचा गौरव**

समाजातील ज्येष्ठ नागरिकांचे योगदान आणि सामाजिक संस्थांच्या कार्याची दखल घेत कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सावनेर येथील स्वामी विवेकानंद वृद्धाश्रमाचे अध्यक्ष युगांत कुंभलकर, आदासा येथील मातोश्री वृद्धाश्रमाचे सचिव विजय शेंडे, ज्येष्ठ नागरिक कक्षाचे सहसंयोजक श्रीराम बांधे आणि कक्षाचे सदस्य सुरेश भुजाडे यांचा ज्येष्ठांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक कक्षाचे सदस्य आणि सामाजिक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातील सहायक लेखाधिकारी संजय पोलके यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कोराडी यात्रेनिमित्त आपली बसच्या एसी बससेवेत दुपटीने वाढ, १० बसद्वारे दररोज ६० फेऱ्यांचे नियोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कोराडी यात्रेदरम्यान कोराडी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन, नागपूर महानगरपालिका अंतर्गत आपली बसतर्फे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यात आली



आहे. भाविकांना सोयीस्कर आणि आरामदायी प्रवास उपलब्ध करून देण्यासाठी अतिरिक्त बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे.

मोरभवन ते कोराडी मंदिर या मार्गावर यापूर्वी ५ एसी बसेस कार्यरत होत्या. वाढती प्रवासीसंख्या लक्षात घेऊन आपली बसतर्फे आणखी ५ अतिरिक्त एसी बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता या मार्गावर एकूण १० एसी बसेस धावणार आहेत. या बसद्वारे दिवसभरात एकूण ६० फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले असून, साधारणतः दर १० मिनिटांनी बस उपलब्ध होणार आहे. यामुळे नागपूर ते कोराडी मंदिर या मार्गावर भाविकांना प्रवास करणे अधिक सोयीचे होणार आहे. या मार्गावरील पहिली बस सकाळी ७:०० वाजता मोरभवन येथून रवाना होईल, तर कोराडी मंदिर येथून शेवटची बस रात्री १०:३० वाजता सुटणार आहे. यामुळे मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दिवसभर बससेवेचा लाभ घेता येणार आहे.

प्रवाशांना अधिक मदत व योग्य माहिती मिळावी, यासाठी मोरभवन येथे तसेच कोराडी मंदिराच्या मागील बाजूस विशेष मदत कक्ष उभारण्यात आले आहेत. या मदत कक्षांद्वारे भाविकांना बससेवेबाबत माहिती आणि आवश्यक सहकार्य उपलब्ध करून दिले जात आहे, जेणेकरून त्यांचा प्रवास अधिक सुलभ आणि सोयीस्कर होईल.

## सालेकसा येथील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचा पोलीस विभागाकडून गौरव

### डीजेमुक्त विसर्जन व शांततापूर्ण उत्सवाबद्दल महाराष्ट्र पोलीस विभागाचे प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह प्रदान

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस स्टेशन सालेकसा येथे आयोजित सत्कार कार्यक्रमात नगर पंचायतजवळ, बाजार चौक सालेकसा येथील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाचा महाराष्ट्र पोलीस विभागाच्यावतीने प्रशस्तीपत्र व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.



प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह स्विकारताना मंडळाचे अध्यक्ष राजु फुंडे

सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाने यावर्षी गणेशोत्सवाचे अकराही दिवस शांततापूर्ण व भक्तिमय वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. तसेच गणेश विसर्जनाच्या वेळी डीजेचा वापर टाळून भजन मंडळाच्या साथीने पारंपरिक व शांततापूर्ण पद्धतीने विसर्जन मिरवणूक काढली. मंडळाने सामाजिक सलोखा, धार्मिक परंपरा आणि शांततेचा आदर्श निर्माण केल्याबद्दल पोलीस विभागाकडून या कार्याची दखल घेण्यात आली.

सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाने यावर्षी गणेशोत्सवाचे अकराही दिवस शांततापूर्ण व भक्तिमय वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. तसेच गणेश विसर्जनाच्या वेळी डीजेचा वापर टाळून भजन मंडळाच्या साथीने पारंपरिक व शांततापूर्ण पद्धतीने विसर्जन मिरवणूक काढली. मंडळाने सामाजिक सलोखा, धार्मिक परंपरा आणि शांततेचा आदर्श निर्माण केल्याबद्दल पोलीस विभागाकडून या कार्याची दखल घेण्यात आली.

सालेकसा तालुक्यात एकूण १५३ सार्वजनिक गणेश मंडळे होती. त्यापैकी ३९ मंडळांनी डीजेमुक्त विसर्जन करून भजन मंडळाच्या साथीने शांततेत विसर्जन केले. या उपक्रमात उल्लेखनीय सहभाग नोंदविणाऱ्या सार्वजनिक गणेश उत्सव मंडळ, नगर पंचायतजवळ, बाजार चौक सालेकसा याला विशेष सन्मानित करण्यात आले.

हा सत्कार उपविभागीय पोलीस अधिकारी नंदिनी चानपूरकर (आमगाव) आणि पोलीस निरीक्षक रवी नागोसे (पोलीस स्टेशन सालेकसा) यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष राजु फुंडे, उपाध्यक्ष सुनील हत्तीमारे, मार्गदर्शक तथा पोलीस पाटील राजेंद्र बागडे, कोषाध्यक्ष अशोक कटरे आणि सदस्य विद्याकुमार बहेकार यांनी सन्मान स्वीकारला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. गणेश भदाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. राकेश रोकडे यांनी केले. यावेळी पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पोलीस हवालदार विशाल जनबंधू आणि पोलीस कॉन्स्टेबल जयश्री चौडे यांनी विशेष नियोजन केले. यावेळी पोलीस विभागाच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष राजु फुंडे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या शांततापूर्ण गणेशोत्सव उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. तसेच मार्गदर्शक तथा पोलीस पाटील राजेंद्र बागडे यांनीही अध्यक्ष राजु फुंडे यांच्या पुढाकाराचे आणि कार्याचे विशेष कौतुक केले.

डीजेमुक्त गणेशोत्सव, भजनातून भक्ती आणि शांततेत विसर्जन हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, अशा उपक्रमांमुळे पोलीस व नागरिकांमधील समन्वय अधिक दृढ होण्यास मदत होत आहे.

थोडक्यात

# भवानीच्या आगमनाने दुमदुमली नगरी

## प्राचीन सटवा माता मंदिर मनोकामना ज्योतीने उजळून निघाले, ८८५ अखंड मनोकामना ज्योती मनमोहत आहेत



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

शारदीय नवरात्री उत्सव जसजसा पुढे सरकत आहे, तसतशी दुर्गा मातेच्या दर्शनाची भाविकांची उत्सुकता वाढत असून शहरातील मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी झाली आहे. या चालू असलेल्या नवरात्री उत्सवादरम्यान मंदिरे विजेच्या दिव्यांनी उजळून निघाली आहेत. प्राचीन सत्व माता मंदिर, मारा माई मंदिर, जय माता दी दुर्गा मंदिर (पुराण धान्य गंज), दुर्गा मंदिर (गडकरी चौक), माता मंदिर (मातखेडी), शीतला माता मंदिर (पहलेपर), पुरतन माता मंदिर (मोहपा रोड) आणि इतर मंदिरांमध्ये तसेच अनेक घरांमध्ये, इच्छापूर्तीसाठी आई दुर्गा भवानी चा घट स्थापित करण्यात आले आहेत व मोठ्या आनंदाने माता दुर्गेची पूजा आराधना केली जात आहे. सकाळी ५ वाजल्यापासून सुरू होणारी आरती, भजन, जस, जागराते, जागरण इत्यादी कार्यक्रमांमुळे झालेल्या भक्तांच्या गर्दीमुळे शहराचे वातावरण भक्तीभावाने भरून गेले होते.

प्राचीन सटवा माता मंदिरात ८८५ अखंड मनोकामना ज्योती प्रज्वलित करण्यात आल्या आहेत आणि सकाळी ५, सकाळी ७ आणि सायंकाळी ७:३० वाजता होणाऱ्या महाआरतीला हजारो भक्तांची प्रचंड गर्दी, दिवसभर दर्शनासाठी लागलेल्या लांबच लांब रांगा, यामुळे जणू काही माता जगदंबेचे अस्तित्व जाणवत आहे.

# १५ ऑक्टोबरला मुंबईतील आझाद मैदानावर महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे धरणे आंदोलन

## महानिर्मितीच्या ८०० तंत्रज्ञ-३ पदांवरील निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या रखडल्या!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर / मुंबई**

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीच्या (महानिर्मिती) तंत्रज्ञ-३ पदाच्या भरती प्रक्रियेत अंतिम निवड होऊनही नियुक्ती आदेशाच्या प्रतीक्षेत असलेल्या ८०० उमेदवारांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या वर्षभरापासून नियुक्ती प्रक्रिया रखडल्याने निवड झालेल्या उमेदवारांमध्ये असंतोष निर्माण झाला असून, या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या वतीने गुरुवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. महानिर्मिती कंपनीच्या व्यवस्थापनाने एप्रिल २०२४ मध्ये तंत्रज्ञ-३ पदाच्या ८०० जागांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. जाहिरातीतील अटी व शर्तीनुसार लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर आयबीपीएस कंपनीच्या माध्यमातून भरती प्रक्रिया राबवून ८०० उमेदवारांची अंतिम निवड यादी महानिर्मितीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. या निवड यादीत महानिर्मिती कंपनीने प्रकल्प उभारण्यासाठी जमीन संपादित केलेल्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांतील ४०० उमेदवारांचाही समावेश असल्याचे फेडरेशनच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. अंतिम निवड यादी प्रसिद्ध झाल्यानंतर उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. मात्र, भरती प्रक्रियेत निवड न झालेल्या काही उमेदवारांनी न्यायालयात धाव घेतल्याने नियुक्ती प्रक्रिया थांबल्याचे सांगण्यात येत आहे. परिणामी, लेखी परीक्षा आणि निवड प्रक्रियेतील सर्व टप्पे पूर्ण करून अंतिम यादीत स्थान मिळवलेल्या उमेदवारांना गेल्या वर्षभरापासून नियुक्तीची प्रतीक्षा करावी लागत आहे. या विलंबामुळे उमेदवारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असून, संबंधितांनी तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

**फेडरेशनच्या चार प्रमुख मागण्या**

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने महानिर्मिती कंपनीचे व्यवस्थापन आणि शासनासमोर चार प्रमुख मागण्या मांडल्या आहेत.

१. तात्काळ नियुक्ती आदेश द्या : जाहिरातीतील अटी व शर्तींच्या अधीन राहून अंतिम निवड झालेल्या ८०० उमेदवारांना तातडीने नियुक्ती आदेश देण्यात यावेत. २. न्यायालयीन निकालाच्या अधीन नियुक्त्या द्या : भरती प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्याबाबत विचार करावा. तसेच न्यायालयाचा जो निर्णय येईल, तो संबंधित निवड झालेल्या उमेदवारांना बंधनकारक राहील, अशी तरतूद नियुक्ती प्रक्रियेत नमूद करावी. ३. रिक्त पदांची भरती जाहीर करा : महानिर्मिती कंपनीतील मंजूर रिक्त पदे भरण्यासाठी नवीन भरतीची जाहिरात तातडीने प्रसिद्ध करण्यात यावी. ४. न्यायालयीन प्रकरणे एकत्रित चालवा : भरती प्रक्रियेशी संबंधित सर्व न्यायालयीन प्रकरणे एकत्र करून मुंबई उच्च न्यायालयात चालविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

**निवड झालेल्या उमेदवारांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन**

महानिर्मिती कंपनीच्या भरती प्रक्रियेत अंतिम निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्त्यांचा प्रश्न मार्गी लागावा आणि कंपनी व्यवस्थापनासह शासनाचे लक्ष या विषयाकडे वेधले जावे, या उद्देशाने हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या धरणे आंदोलनात निवड झालेल्या सर्व उमेदवारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन फेडरेशनचे अध्यक्ष कॉम्रेड मोहन शर्मा, उपाध्यक्ष कॉम्रेड एस. आर. खतीब आणि सरचिटणीस कॉम्रेड कृष्णा भोयर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. आता या आंदोलनानंतर महानिर्मिती कंपनीचे व्यवस्थापन आणि शासन नियुक्ती प्रक्रियेबाबत कोणती भूमिका घेतात, तसेच न्यायालयीन प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या मागण्यांवर काय निर्णय होतो, याकडे संबंधित उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

# अनधिकृत इमारतींच्या दस्तनोंदणीला आळा; नियमबाह्य बांधकामांवर कठोर कारवाई करणार

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर साधेपणाने निवडणूक लढवावी, सुधाकर कोहळे यांच्या विजयाचा विश्वास : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अनधिकृत इमारतींची बांधकामे आणि त्यांची बेकायदेशीर दस्तनोंदणी रोखण्यासाठी राज्य सरकारने कठोर पावले उचलली आहेत. आवश्यक परवानग्या नसलेल्या, विकास आराखड्यातील नियमांचे पालन न करणाऱ्या आणि नियमानुसार मंजुरी न घेतलेल्या इमारतींच्या दस्तनोंदणीला यापुढे आळा घातला जाईल. ज्या इमारतींमधील त्रुटी दूर करून नियमितीकरण शक्य आहे, त्यांच्याबाबत नियमानुसार कार्यवाही केली जाईल; मात्र ज्या इमारती कायदेशीर करणे शक्य नाही, त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी लागेल, असे महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

**अनधिकृत इमारतींच्या नोंदणीवर निर्बंध**

राज्याच्या विविध भागांत रेरा नोंदणी आणि आवश्यक परवानग्यांशिवाय इमारती उभारल्या जात असल्याच्या तक्रारी विधिमंडळात करण्यात आल्या होत्या. पनवेल, ठाणे, पिंपरी-चिंचवड, हवेली, पुणे आणि नागपूर परिसरात अशा बांधकामांच्या तक्रारी आल्या आहेत. अनधिकृत बांधकामे आणि बेकायदेशीर हस्तांतरणाच्या व्यवहारांमध्ये एजंटांचा हस्तक्षेप वाढल्याचेही निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. इमारतींची कागदपत्रे, आवश्यक मंजुरी आणि लागू नियमांचे पालन यांची खातरजमा करूनच दस्तनोंदणीची प्रक्रिया केली जाईल. अनधिकृत फ्लॅटची विक्री करून नागरिकांची फसवणूक होऊ नये, हा यामागील उद्देश आहे. ज्या बांधकामांचे नियमांनुसार नियमितीकरण शक्य आहे, त्यांना आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. कायदेशीर मान्यता मिळणे शक्य नसलेल्या बांधकामांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**शेतकरी आणि कर्जदारांच्या वसुलीचा तगादा खपवून घेणार नाही**

शेतकऱ्यांकडून कर्जवसुली करताना नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारींबाबत बोलताना बावनकुळे यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक कारवाईच्या सूचना देण्यात आल्याचे सांगितले. बँकांकडून बेकायदेशीर पद्धतीने वसुली केली जात असल्याचे आढळल्यास संबंधित प्रकरणांची



तपासणी करून कारवाई करण्यात येईल. अवैध सावकारीविरोधातही कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. मायक्रोफायनान्स कंपन्या आणि इतर वित्तीय संस्थांकडून शेतकऱ्यांवर पैशांसाठी अनावश्यक दबाव आणला जाऊ नये. अशा प्रकारच्या तक्रारी आल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई करावी, असे निर्देश पुन्हा दिले जातील. बँका, मायक्रोफायनान्स कंपन्या किंवा वित्तीय संस्थांकडून शेतकऱ्यांचा छळ सहन केला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

**कर्जमाफीसाठी पात्र शेतकऱ्यांना मदत मिळावी**

शेतकऱ्यांना प्रस्तावित कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यावर सरकारचा भर असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. काही शेतकऱ्यांचे पीककर्ज मंजूर झाले असले, तरी केवायसी प्रक्रिया पूर्ण नसल्यामुळे त्यांना कर्जाचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर शेतकऱ्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेण्यासोबतच अँग्रीस्टॅक नोंदणी करण्यावर भर दिला जाणार आहे. दुसरीकडे, अन्नसुरक्षा योजनेचा लाभ आवश्यक नसलेल्या सक्षम नागरिकांनी स्वेच्छेने या यादीतून बाहेर पडण्याचे आवाहनही त्यांनी केले. नागपूरमध्ये सुमारे ६० हजार नागरिकांनी अन्नसुरक्षा यादीतून आपली नावे वगळली आहेत. राज्यातही अशा प्रकारे मोठ्या संख्येने नावे वगळली गेल्यास गरजू लाभार्थ्यांपर्यंत योजनांचे लाभ पोहोचण्यास मदत होईल, असे ते म्हणाले.

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतून अनिल सोले यांनी माघार घेण्याच्या निर्णयाचे स्वागत करत बावनकुळे म्हणाले, की पक्षहितासाठी आणि संघटनेच्या दृष्टीने अनिल सोले यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांच्याशी चर्चा केली. अनिल सोले आणि गिरीश व्यास यांनी मांडलेल्या सूचना व भूमिका पक्षाने ऐकून घेतल्या आहेत. जुन्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पुढे जाण्याची त्यांची भूमिका पक्षाच्या हिताची आहे. या निवडणुकीत भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. गेल्या ५७ वर्षांपासून भाजपकडे असलेली ही जागा पुन्हा भाजप आणि महायुतीकडेच राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अनिल सोले हे निवडणुकीचा अनुभव असलेले नेते असून, त्यांनी मागील निवडणुकीतही चांगले काम केले आहे. ते आता पक्षाच्या उमेदवाराच्या विजयासाठी सक्रिय होतील, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर साधेपणाने निवडणूक लढवावी**

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या तयारीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, की निवडणुकीच्या काळात पक्षाचे सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी प्रचाराच्या कामाला लागतील. मात्र, राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता निवडणुकीत अनावश्यक बडेजाव टाळून साधेपणाने प्रचार केला पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत दुष्काळग्रस्तांना मदत करणे अधिक महत्त्वाचे आहे. निवडणुकीत भाजपच्या मतदारांनी पूर्ण ताकदीने उतरावे आणि पक्ष संघटनेने एकजुटीने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याचेही त्यांनी सांगितले. भाजपचे सहसंघटनमंत्री सतीश धोंड हे नागपूर मुख्यालयात राहून संघटनात्मक कामकाज पाहणार असल्याची माहिती दिली.

**राहुल गांधींवर टीका**

राहुल गांधी यांच्या भूमिकेवर टीका करताना बावनकुळे म्हणाले, की संविधानाने निर्माण केलेल्या न्यायव्यवस्थेकडे निवेदन देण्याच्या कृतीमागे प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न दिसतो. देशात आणीबाणीसदृश परिस्थिती असल्याचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला जात असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर आपण पंतप्रधान होऊ, अशा स्वप्नात राहुल गांधी वावरत आहेत, अशी टीका त्यांनी केली. संविधानाचा अपमान करण्याचे काम राहुल गांधी करत असल्याचा आरोपही बावनकुळे यांनी केला.

**कंत्राटदारांच्या थकीत देयकांवर उद्या मंत्रिमंडळात चर्चा**

राज्यातील कंत्राटदारांच्या थकीत देयकांचा प्रश्न गंभीर असल्याचे बावनकुळे यांनी मान्य केले. कंत्राटदारांनी पूर्ण केलेल्या कामांचे पैसे वेळेत मिळणे आवश्यक आहे. त्यांना तातडीने दिलासा कसा देता येईल आणि प्रलंबित देयके कशी अदा करता येतील, यावर उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# पाटणसावंगीत नवरात्रोत्सवानिमित्त भव्य कीर्तन महोत्सवाला सुरुवात



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

पाटणसावंगी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील मेस्को माता मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त श्रीराम कथा व भव्य कीर्तन महोत्सवाला रविवार, दि. ११ ऑक्टोबरपासून उत्साहात सुरुवात झाली आहे. हा महोत्सव २४ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. रविवारी सकाळी ९ वाजता मंदिरात विधिवत घटस्थापना करून अखंड ज्योत प्रज्वलित करण्यात आली. यावेळी विशेष पूजा व आरती करण्यात आली. सायंकाळी ४ वाजता कथाव्यास ह.भ.प. भूषण महाराज सिंगरवाडे यांच्या श्रीराम कथा वाचनाला सुरुवात झाली.

मेस्को माता मंदिर समितीच्या वतीने आयोजित या १४ दिवसीय महोत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिर परिसरात भव्य मंडप उभारण्यात आला असून, तोरणे व आकर्षक विद्युत रोषणाईने परिसर सजविण्यात आला आहे.



**दररोज धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल**

महोत्सवादरम्यान दररोज पहाटे ५ ते ६ वाजेपर्यंत काकडा, सकाळी ७ वाजता महाआरती, सकाळी ९ ते १२ श्रीराम कथा वाचन, दुपारी १ ते ३ भजन, दुपारी ३ ते ४ गरबा-दांडिया, सायं ४ ये ६ हरिपाठ, सायं ६ वाजता महाआरती आणि रात्री ८ ते ११ वाजेपर्यंत कीर्तन असे विविध कार्यक्रम होणार आहेत. ह.भ.प. भूषण महाराज सिंगरवाडे, शेंदूरजनाघाट (अमरावती) यांच्या वाणीतून श्रीराम कथेचे वाचन होणार आहे. मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता घट विसर्जनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक ते कोलार नदीवरील संगमेश्वर घाटापर्यंत कलश यात्रा काढण्यात येणार आहे.

**भाविकांसाठी विशेष व्यवस्था**

या धार्मिक सोहळ्याला हजारो भाविक व नागरिक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी मंदिर समितीच्या वतीने पिण्याचे पाणी, शौचालये व वाहनतळाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

या श्रीराम कथा व भव्य कीर्तन महोत्सवातील सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# हॅकर्सनी फ्रिजचा शस्त्रासारखा केला वापर

**पॅरिस :** सायबर अटॅकचा एक धक्कादायक आणि आश्चर्यकारक असा प्रकार समोर आला आहे. यात हॅकर्सनी मोबाईल लॅपटॉप किंवा पीसी नाही तर थेट फ्रीज हॅक केला. सुपर मार्केटमधील सर्व रेफ्रिजरेशन सिस्टमच हॅक करून मोठे नुकसान करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार फ्रान्समध्ये हा सायबर अटॅक झाला असून हॅकर्सनी सुपर मार्केटमधील फ्रिज आणि फ्रिजरचे तापमान ५० डिग्रीपर्यंत वाढवून ठेवलं. त्यामुळं खाण्या पिण्याच्या अनेक गोष्टी खराब झाल्या. तसेच काही ठिकाणी आग लागण्याच्या घटना देखील घडल्या आहेत. या घटनेनंतर इंटरनेटशी जोडल्या गेलेल्या डिवाईस किंवा मशिनच्या सायबर सुरक्षेबाबत मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

फ्रान्समधील इंटरमोर्शे, कॅरेफोर आणि कोऑपरेटिव यू सारख्या सुपरमार्केट चेन स्टोअरवर हा हल्ला करण्यात आला. काही रिपोर्ट्सनुसार हा सायबर हल्ला शेकडो स्टोअर्सपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. सुरूवातीच्या तापासात डेन्मार्कची कंपनी डॅनफोसच्या रिफ्रिजरेशन मॅनेजमेंट सिस्टमशी जोडली गेलेल्या सुरक्षा यंत्रणेच्या त्रुटीचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र या सायबर अटॅकच्या मागे कोण होता आणि ते या सिस्टमपर्यंत तो कसा पोहचला याची माहिती समोर आलेली नाही. मोठमोठ्या सुपर मार्केटमध्ये शेकडो फ्रीज आणि फ्रिजर असतात. त्यांचे तापमान कंट्रोल करण्यासाठी आणि देखरेख करण्यासाठी डिजीटल कंट्रोल सिस्टमचा वापर केला जातो.

# महावितरणच्या 'सेवा सेतू' अभियानाला मोठा प्रतिसाद

## ३६६ ठिकाणी शिबिरे, २४ मेगावॉट सौर ऊर्जा कार्यान्वित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील वीज ग्राहकांसाठी महावितरणने राबवलेल्या सेवा सेतू आणि सेवा संकल्प अभियानाला नागरिकांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला आहे. नागपूर शहर, नागपूर ग्रामीण आणि वर्धा या तिन्ही मंडळांमध्ये मिळून महावितरणने तब्बल ३६६ ठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन केले होते. या शिबिरांच्या माध्यमातून ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारी जागीच सोडवण्यात आल्या, तसेच नवीन वीज जोडणी आणि सौर ऊर्जेचा वापर वाढवण्यावर विशेष भर देण्यात आला.

नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता, राजेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या अभियानात सुमारे ३ हजार ४७६ हून अधिक नागरिकांनी





प्रत्यक्ष शिबिरांना भेटी देऊन सेवांचा लाभ घेतला. वीज ग्राहकांना कोणताही त्रास न होता वेळेत सेवा मिळावी आणि परिसरात पर्यावरणपूरक ऊर्जेचा प्रसार व्हावा, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता. यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी स्वतः मैदानात उतरले आणि त्यांनी ग्राहकांच्या अडचणी थेट समजून घेऊन त्या सोडवल्या.

**'पीएम सूर्यघर' आणि रूफटॉप सोलरला पसंती:**

या शिबिरांमध्ये केंद्र सरकारची 'पीएम सूर्यघर मोफत वीज योजना' आणि राज्याची 'रूफटॉप सोलर योजना' नागरिकांच्या विशेष पसंतीस उतरली. अभियानादरम्यान परिमंडलातून तब्बल ७ हजार ४३५ ग्राहकांनी सौर ऊर्जेसाठी नोंदणी केली. त्यापैकी ६ हजार ४४ ग्राहकांच्या घरांवर सौर ऊर्जेची यंत्रणा बसवण्यात आली त्यापैकी नागपूर जिल्ह्यातील ५ हजार १८० तर वर्धा जिल्ह्यातील ८६४ यंत्रणेचा समावेश असून ५ हजार ४०० ग्राहकांचे नेट मीटरिंग पूर्ण करून त्यांना बिलिंग प्रणालीशी जोडण्यात आले आहे. यामुळे नागपूर परिमंडलात २४.२७ मेगावॉट क्षमतेची नवीन सौर ऊर्जा तयार होत आहे. शिबिराच्या ठिकाणी बँकांचे प्रतिनिधी आणि सोलर विक्रेते उपस्थित असल्याने अर्जाची नोंदणी व कर्जाची प्रक्रिया ग्राहकांसाठी अधिक सोपी झाली होती.

**प्रलंबित तक्रारींचा वेगाने निपटारा:**

नागरिकांना नियमित येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी महावितरणने या काळात विशेष मोहीम चालवली. परिमंडलातील २७ हजार ८०९ प्रलंबित तक्रारींपैकी तब्बल १५ हजार ७०४ तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यात आला. यामध्ये चुकीची वीज बिले दुरुस्त करणे, बंद पडलेले मीटर बदलणे, नावात बदल करणे आणि नवीन वीज जोडणी देणे अशा कामांचा समावेश होता. सोबतच शेतकरी बांधवांच्या कृषी सौर पंपांशी संबंधित समस्यांवरही प्राधान्याने तोडगा काढण्यात आला.

**शाळा आणि गावांमध्ये वीज सुरक्षेचे धडे**

केवळ तक्रार निवारण न करता लोकांमध्ये वीज सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यावरही भर देण्यात आला. नागपूर व वर्धा जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना वीज बचत आणि सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले. याशिवाय गावांमध्ये शेतकरी व ग्रामस्थांना कॅपेसिटर बँकेचा वापर आणि वीज अपघातांपासून संरक्षणाबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यात आली.

त्रिमूर्ती नगर उपविभागातील शिबिराला आरईसी च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली आणि महावितरणच्या या उपक्रमाचे कौतुक केले. या थेट ग्राहक सेवेमुळे महावितरण आणि ग्राहक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक मजबूत झाले आहे.

# विवेक आणि परिवर्तनाचा कृपाप्रसाद: कुष्मांडा देवी

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

नवदुर्गेंचे चौथे रूप म्हणजे कुष्मांडा देवीचे. कुष्मांडा देवीच्या बद्दल सांगायचे झाल्यास 'कु' म्हणजे थोडेसे. 'उष्मा' म्हणजे उष्णता किंवा ऊर्जा आणि 'अंडा' म्हणजे ब्रह्मांडाचा आकार. तिच्या मंद हास्याने संपूर्ण ब्रह्मांडातील स्थित पृथ्वीची निर्मिती झाली. म्हणून तिचे नाव कुष्मांडा पडले. कुष्मांडा देवीला आठ हात आहेत. तिच्या हातात चक्र, गदा, कमळ, धनुष्यबाण, कमंडलू, अमृत कलश, जपमाळ आणि गदा आहे. देवीचे वाहन सिंह आहे. जेव्हा विश्व अस्तित्वात नव्हते तेव्हा या देवीने त्याची निर्मिती केली म्हणून तीसृष्टीची आद्यस्वरूप आद्यशक्ती आहे. कुष्मांडा देवीची उपासनांमध्ये सृजनशक्ती, ऊर्जा, सकारात्मकता आणि जीवनातील नवचैतन्य यांचे प्रतीक मानले जाते.

धार्मिक मान्यतेनुसार, देवीच्या मंद हास्यातून विश्वाची निर्मिती झाली. अशा आख्यायिके मागचा आशय केवळ आध्यात्मिक नसून तो मानवी जीवनालाही दिशा देणारा आहे.निराशाच्या अंधारात आशेचा किरण निर्माण करणे, संकटातून मार्ग शोधणे आणि समाजाच्या कल्याणासाठी सर्जनशील विचारांना कृतीची जोड देणे हा कुष्मांडा देवीच्या रुपातून महत्त्वपूर्ण सामाजिक संदेश आहे. विश्व निर्मितीची प्रतीक असलेली कुष्मांडा देवी माणसाला सुजनशीलतेचे महत्त्व पटवून देते.समाजाची प्रगती केवळ भौतिक गरजा, साधन संपत्तीच्या उपलब्धतेवर अवलंबून नसते. तर ती माणसांच्या विचारांवर, कल्पनेवर आणि कृतीवर अवलंबून असते.

जुनाट कल्पना, समाजात वितुष्ट निर्माण करणारे कर्मकांडे, दांभिकता, सत्ता-संघर्ष, वर्ण, लिंगभेद, जातीभेदांचा प्रसारा दूर करण्यासाठी समाजाला कायम विवेकनिष्ठ विचाराची गरज भासते.शिक्षण, विकासनिष्ठ दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकीच्या साह्याने नव्या समाजाची निर्मिती शक्य आहे.



आज समाजासमोर बेरोजगारी, अमली पदार्थाचा विळखा, स्त्रियांवरील अन्यायांची श्रृंखला, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, कामगारांचे शोषण, पर्यावरणावरील अरिष्ठ यासारख्या दुरावस्थावर चिंता करून चालणार नाही.त्यासाठी समस्त मानवजातीने स्वतःपासून वैश्विक पातळीवर सामूहिक प्रयत्न, प्रेरक विचाराने क्रियाशील धुरा सांभाळण्याची वेळ येऊन ठेपली आहे. कुष्मांडा देवी ही स्त्रीरुप असून तिची व्यापकता अधोरेखित करते. स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधारस्तंभ नसून,ती समाजाच्या जडणघडणीत महत्त्वाची शक्ती आहे.शिक्षण, आरोग्य, अर्थकारण, विज्ञान, कार्पोरेट, संरक्षण, प्रशासन, तंत्रज्ञान, राजकारण अशा विविध क्षेत्रात महिला आपल्या कर्तव्याचा ठसा उमटवीत आहे. तर काहींच्या बाबतीत आजही असमानता, हिंसाचार,मानसिक छळ, सापत्न वागणुकीचा सामना करावा लागत आहे.

आज देवीची उपासना करताना समाजातील स्त्रीशक्तीला सन्मानाने वागणूक मिळणे तेवढेच महत्त्वाचे ठरते. लिंगभेद, उच्चनीच भेद न करता शैक्षणिक, आर्थिक, वैचारिक निर्णयाचा, स्वातंत्र्याचा आदर करणे जरुरीचे बनते. तिच्या बाबतीत कुठल्याही प्रकारचा अन्याय होत असेल,तर त्या विरोधात ठाम भूमिका घेतली पाहिजे. हीच खऱ्या अर्थाने स्त्री शक्तीच्या उपासनेची खरी फलश्रृती आहे. देवीच्या समोर नवरात्रीत निरंतर नंदादीप तेवत ठेवण्याबरोबर, स्त्रीचे तेजोमय रूप अबाधित ठेवणे समाजाची जबाबदारी आहे.

कुष्मांडा देवीच्या आख्यायिकेतून सांगितले जाते की, तिच्या हास्याने विश्वातला अंधकार दूर केला. आजच्या काळातील अंधकार आहे नैराश्याचा, ताण-तणावाचा, करियर, पाल्यांच्या अवास्तव गरजा, सामाजिक प्रतिष्ठा, प्रसिद्धी, यश, अपयश, अशा अनाठाई घातकी अशा अपेक्षांकडे स्त्रिया घरात, कामाच्या ठिकाणी,सतत तणावाखाली जातात.त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य आज हरवले आहे. कुष्मांडा देवी आपल्याला शिकवते की आई, बहीण, सहचरणी, मुलींचे एक छोटेसे हास्य संपूर्ण घराला ऊर्जा देऊ शकते. पण त्या हास्यामागे तिला अनुकूल वातावरण व सन्मान अपेक्षित असतो. तिच्या हास्याचा जर आपण आदर केला तर घरात ब्रम्हांड फुलेल यात शंका नाही.

कुष्पांडा देवी ही आरोग्याची व पोषणाचे प्रतिमा मानले जाते. आज आपल्या समाजात कुपोषणाची समस्या मोठी आहे. आदिवासी दुर्गम भागात महिला व बालकांमध्ये रक्तांची कमतरता आहे. नवरात्रीच्या काळात देवीला कोहळ्याचा नैवेद्य आपण दाखवतो.त्या मागचे कारण पोषणतत्व. आपल्या समाजातील, घरातील महिलांच्या ताटात सकस आहार आहे काय? याचा विचार व्हायला हवा. पोषणाविना कुटुंब व समाज सशक्त होणार नाही.त्यामुळे सकस आरांच्या संकल्प नवरात्रीच्या काळात घ्यायला हवा.

कुष्मांडा देवीच्या आठ हातातील अस्त्रे नाहीत,तर ते आठ सिद्धी आहेत.आजच्या स्त्रीला आठ हात आहेत.ती एका हाताने उत्तम सहचरणी आहे. तर दुसऱ्या हाताने पाल्यांचा सांभाळ करते व सुसंस्कार देते. तिच्या हाताने तिसऱ्या हाताने कौशल्य दाखवून तिचे वेगवेगळी ओळख निर्माण करते. एकंदरीत आजची स्त्री ही मल्टीटास्कींगची देवी आहे.

नवरात्रीचे पर्व म्हणजे आदिशक्तीच्या विविध रूपांचे स्मरण करून जीवनमूल्यांचा जागर करण्याचा उत्सव. या पर्वातील चौथे रूप असलेल्या कुष्मांडा देवीची उपासना सृजनशक्ती, सकारात्मक ऊर्जा व जीवनात हास्य फुलून सशक्त समाज निर्मितीची ऊर्जा प्रदान करते.

मो. ९१३०८३५४५८

# चौथा दिवस : आरोग्यसेवेतील दुर्गाशक्ती 'आशा स्वयंसेविका'

सौ. माधुरी धनोकार,
अकोला

***आरोग्याची ज्योत घेऊन, पोहोचती घरोघरी, सेवाभाव जपतात, संकटातही धीर धरी; मातृत्वाची माया अन् कर्तव्याची साथ, आशा स्वयंसेविका दाखवितात आरोग्याची वाट.***

नवरात्री म्हणजे स्त्रीशक्तीचा जागर, कर्तृत्वाचा सन्मान आणि समाजासाठी झटणाऱ्या महिलांच्या कार्याला सलाम करण्याचा उत्सव. नवरात्रीच्या चौथ्या दिवशी आपण अशा महिलांची ओळख करून घेणार आहोत, ज्या ग्रामीण भागापासून ते शहरी वस्त्यांपर्यंत आरोग्यसेवेची ज्योत अखंड तेवत ठेवतात. त्या म्हणजे आशा स्वयंसेविका!

**आशा स्वयंसेविका : आरोग्यसेवेतील खऱ्या दुर्गाशक्ती**

आशा म्हणजेच Accredited Social Health Activist. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत समुदाय आणि आरोग्य यंत्रणा यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून आशा स्वयंसेविका कार्य करतात. आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, महिलांना आणि बालकांना आरोग्यसेवांशी जोडणे, तसेच गरजू कुटुंबांना योग्य आरोग्यसेवा मिळवून देण्यासाठी मदत करणे, ही त्यांची प्रमुख कामे आहेत.

गावातील प्रत्येक घराशी संपर्क ठेवत, कुटुंबांच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेत त्या आरोग्यसेवेचा मार्ग दाखवतात. गर्भवती महिलांची काळजी घेणे, नियमित तपासणीसाठी मार्गदर्शन करणे, सुरक्षित प्रसूतीसाठी रुग्णालयात जाण्याबाबत जनजागृती करणे, नवजात बालकांचे आरोग्य, बालकांचे लसीकरण, कुपोषण प्रतिबंध आणि कुटुंब नियोजनाविषयी माहिती देणे, अशा विविध जबाबदाऱ्या त्या पार पाडतात.

क्षयरोग, संसर्गजन्य आजार आणि इतर आरोग्यविषयक समस्यांबाबत जनजागृती करणे, आरोग्य शिबिरांची माहिती पोहोचवणे आणि गरजेनुसार



रुग्णांना आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी मदत करणे, यामध्येही त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

**सेवाभावातून घडते आरोग्यदायी समाजनिर्मिती**

आशा स्वयंसेविकांचे कार्य केवळ आरोग्यविषयक माहिती देण्यापुरते मर्यादित नाही. अनेकदा त्या घराघरांत जाऊन लोकांना समजावतात, गैरसमज दूर करतात आणि आरोग्यसेवेबद्दल विश्वास निर्माण करतात. ग्रामीण भागात तसेच वंचित वस्त्यांमध्ये त्यांचे योगदान विशेष महत्त्वाचे ठरते. कधी उन्हातान्हात, कधी पावसात, तर कधी प्रतिकूल परिस्थितीतही त्या आपल्या कामासाठी तत्पर असतात. त्यांच्या कामामागे समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्याची भावना असते. मात्र, या कामात त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. कामाचा मोठा व्याप, प्रवास, विविध नोंदी ठेवण्याची जबाबदारी आणि मानधनाशी संबंधित प्रश्न यांचाही विचार होणे आवश्यक आहे.

त्यांच्या योगदानाची योग्य दखल घेणे, कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे, आवश्यक प्रशिक्षण व साधने उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या सन्मानाला प्राधान्य देणे, ही समाजाची व संबंधित यंत्रणांची जबाबदारी आहे.

**आशा स्वयंसेविका म्हणजे समाजाच्या आरोग्याची आशा!**

नवरात्रीत आपण देवीच्या विविध रूपांची पूजा करतो. परंतु समाजासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या महिलांमध्येही आपल्याला दुर्गाशक्तीचे दर्शन घडते. आशा स्वयंसेविका या त्याचे उत्तम उदाहरण आहेत. त्यांच्या कार्यामुळे आरोग्यसेवेचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतो आणि निरोगी समाज घडविण्याच्या प्रयत्नांना बळ मिळते. या नवरात्रीत आशा स्वयंसेविकांच्या सेवाभावाला सलाम करूया. त्यांच्या कार्याचा सन्मान करूया आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहूया.

कारण, आरोग्याची काळजी घेणारी प्रत्येक आशा स्वयंसेविका ही खऱ्या अर्थाने समाजाच्या आरोग्याची रक्षणकर्ती आहे. तिच्या सेवेतूनच सशक्त महिला आणि निरोगी समाजाचे स्वप्न साकार होऊ शकते.

# नागपुरात डिसेंबरमध्ये घेण्याचे जाहीर झालेले शासकीय पाचवे विश्व मराठी संमेलन होणार की नाही?

## हेच संमेलन लंडनला पळवले जात असल्याची शंका, नागपूर-विदर्भाशी शासनाने सापत्नभावाने वागणे सोडावे, शासन, प्रशासनाने संभ्रम दूर साराला, मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळ, महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी, जन सांस्कृतिक विकास प्रतिष्ठानच्यावतीने मुख्यमंत्र्यांना पत्र

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपुरात डिसेंबरमध्ये घेण्याचे मराठी भाषा मंत्र्यांनी जाहीर केलेले शासकीय पाचवे विश्व मराठी संमेलन नागपुरात होणार की हेच संमेलन लंडनला पळवले जात असल्याची व नागपूर, विदर्भाला नेहमीप्रमाणेच शासन, प्रशासन सापत्नभावाचीच वागणूक देणार असल्याची शंका अद्याप नागपुरात कोणतीच हालचाल या संदर्भात नसल्याने व तारखाही जाहीर केल्या जात नसल्याने व्यक्त होवू लागली आहे.

नागपूर -विदर्भाशी शासनाने सापत्नभावाने वागणे सोडावे आणि शासन, प्रशासनाने याबाबतचा संभ्रम दूर सारावा अशा मागण्या करणारे पत्र देण्यात आले आहे. मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळ, महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी,जन सांस्कृतिक विकास प्रतिष्ठान इ.संस्थांच्या वतीने अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मराठी भाषा मंत्री, तसेच मराठी भाषा सचिव आणि राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक यांना पाठवले आहे. सोबत १३ सप्टेंबर रोजी ना एकनाथ शिंदे यांना याबाबत सूचना करणारे जे पत्र पाठवले होते ते देखील जोडण्यात आले आहे.

विश्व मराठी संमेलनासारखी संमेलने ही शासन, प्रशासनाने करण्याची कामं नसून ती आमच्या सारख्या मराठी विषयक काम करणाऱ्यांच्या संस्था, साहित्य संस्था यांची कामं आहेत. शासन, प्रशासनाने त्यांच्या कडूनच ती करून घेतली पाहिजे ही आमची भूमिका कायमच आहे.

मात्र शासन, प्रशासन त्याकडे साफ दुर्लक्ष करत आता स्वतःच आमच्या सारख्यांनी करावयाची कामे प्रशासनाकडून करून घेवू लागली आहे. त्यामुळे या संमेलनांचे तसेही शासकीयीकरणच झाले आहे व त्याला भाषा,साहित्य, संस्कृती विषयक स्वयंसेवी संस्थात्मक महाराष्ट्राचा विरोध असला तरीही शासन तो लक्षात न घेता स्वतःच ते करत निघाले आहेत. आता तर विश्व मराठी संमेलन लंडन येथे शासन घेणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

नागपूर -विदर्भाच्या वाट्याला तसेही फार काही येवूच द्यायचे नाही व केवळ देण्याच्या घोषणा करत झुलवत राहायचे, अशीच या राज्याने सततच नागपूर - विदर्भाला सापत्नभावाचीच वागणूक दिल्याचाच या राज्याचा इतिहास आहे. शासनाची ही कार्यपद्धतीच झालेली आहे.

विश्व मराठी संमेलन नागपुरात घेण्याची घोषणा तेवढी करायचे मात्र प्रत्यक्षात ते नागपूर - विदर्भात होऊ द्यायचे नाही असे प्रयत्न वेगाने कोणीतरी करते आहे, अशी नागपूरकरांना शंका आहे. त्यामुळेच अद्यापही त्याबाबत कोणतीच हालचाल नागपुरात शासनाने केलेली नाही.

नागपूर -विदर्भावरील अन्यायाच्या मालिकेत असे झाले तर ही नवीन भर घातली जाईल व नागपूर - विदर्भाच्या सांस्कृतिक अनुशेषात विश्व मराठी संमेलनाच्या अनुशेषाची भर घातली जाईल याकडे या पत्राद्वारे आपले लक्ष वेधत आहोत. पाचवे विश्व मराठी संमेलन शासन खरोखरच नागपुरात घेणार असेल तर नेमके ते कोणत्या तारखांना ते संबंधित यंत्रणेनेच कृपया त्वरित जाहीर करून या बाबत निर्माण झालेला संभ्रम व हेच संमेलन लंडनला पळवले जात असल्याची शंका दूर सारावी अशी विनंती करीत आहोत असे डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी पत्रात म्हटले आहे.

# भारताचे एक लाडके राष्ट्रपती : डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ आणि माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना विधानसभेत श्रद्धांजली अर्पण करताना डॉ.कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जाईल, असे जाहीर केले होते. त्याच पार्श्वभूमीवर येणाऱ्या १५ ऑक्टोबर रोजी शाळा, महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येणार आहे. आपल्याला सगळ्यांनाच माहित आहे की, डॉ.कलाम यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू होते. जसे त्यांच्यामध्ये असणारी दुर्दम्य इच्छाशक्ती, आत्मविश्वास, कणखर मन आणि दिलदार स्वभाव. यामुळेच डॉ.कलाम यांनी देशाच्या युवा पिढीला आपल्या विचारांनी आणि कर्तृत्वाने भारावून टाकले होते.

भारत नक्कीच महासत्ता बनेल असा विश्वास त्यांनी प्रत्येक भारतीयाच्या मनात निर्माण केला होता. त्यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांमधून येणाऱ्या काळात भारत कसा महासत्ता म्हणून पुढे येणार आहे? भारताची खरी शक्ती ही युवाशक्ती कशी असणार आहे? हे त्यांनी सांगितले आहे. डॉ.कलाम यांचे लेखन स्फूतीर्दायी आहे. त्यामुळे शाळा-महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांची पुस्तके वाचावीत, त्याचबरोबर इतर साहित्याचेही जास्तीत जास्त वाचन करावे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन केले जात आहे. या वाचन प्रेरणा दिनामध्ये अधिकाधिक कार्यालये, बँका, कार्पोरेट कार्यालये यांनीही सहभाग घ्यावा आणि वाचन संस्कृतीला बळकट करावे असे आवाहन केले आहे.

**वाचन प्रेरणा दिनामागची नेमकी भूमिका:** शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची आवड निर्माण करण्याचे उद्दिष्ट वाचन प्रेरणा दिनाचे आहे. आजच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासाच्या व्यतिरिक्त अवांतर वाचन होणे आवश्यक आहे. वाचनामुळे होणारे फायदे, अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांना अनेक संदर्भ मिळतात, त्यांची आकलन शक्ती वाढते तसेच इतरांवर आपल्या ज्ञानाचा प्रभाव टाकण्यासाठीही अवांतर वाचनाचा उपयोग होतो, विद्यार्थ्यांचा व्यक्तिगत विकास होतो, हेच नेमके या उपक्रमातून साध्य करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. म्हणूनच शाळा महाविद्यालयापर्यंत हा उपक्रम सिमित न ठेवता आपण सर्वांनी वाचले पाहिजे, असे वाटते. "वाचाल तर वाचाल" असे म्हटले जाते. आजच्या २१ व्या शतकातही हे आपल्याला तंतोतंत लागू पडणारे आहे.

आजचा शाळेत जाणारा विद्यार्थी असो वा महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी, विद्याथीर्नी यांना टी.व्ही, स्मार्ट फोन, टॅबलेट, कॉम्प्युटर यापासून बाजूला करुन त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, या दिनाचा प्रमुख उद्देश आहे. हा दिवस त्या दिना पुरता मयार्दीत न राहता नेहमीच पुस्तके, मासिके, साहित्ये यांचे वाचन व्हावे, ही यामागील प्रामाणिक भावना आहे.

**वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रम:** शाळांमध्ये दर आठवड्यातील एक तास अवांतर वाचनासाठी राखीव ठेवणे, शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये डॉ.अब्दुल कलाम वाचन कट्टा तयार करणे यासारखे उपक्रम वाचन प्रेरणा दिनानिमित्त हाती घेण्यात येतात. या दिनाच्या निमित्ताने शाळांनी इनोवेटिव्ह फंडामधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरतील, अशी पुस्तके खरेदी करून वाचण्यासाठी उपलब्ध करून द्यावीत. तसेच शाळा महाविद्यालयांमध्ये वाचनाचे महत्व पटवून देण्यासाठी साहित्यिकांमार्फत मार्गदर्शन करण्यात यावे.

वाचन दिनाच्या निमित्ताने त्या दिवसातील एक तास वाचनासाठी देण्याचा प्रयत्न करावा. तसेच एकमेकांना पुस्तक भेट देणे, आईने वडिलांना, वडिलाने आईला, मुलाने वडिलांना देणे, पती'पत्नी ने एकमेकांना पुस्तके भेट देणे, असा उपक्रम साजरा व्हावा जेणेकरुन सर्वांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होईल. याशिवाय वाचन दिन अधिकाधिक यशस्वी होण्यासाठी सोशल मीडियाचा वापरही करण्यात यावा. शिक्षण विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिनाचा खास लोगो तयार करण्यात आला आहे, हा लोगो व्हॉटसपच्या तसेच ट्विटरच्या माध्यमातून सर्वांपर्यंत पोहोचवून त्याचा प्रचार करण्यात येत आहे. तसेच साहित्यिक, मान्यवर व्यक्तींनी वाचनाचे महत्व सांगणारे ट्विट करावे, असे आवाहनही या वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने करण्यात आले आहे.

मुळातच विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या प्रत्येक घटकांमध्ये वाचनाची आवड, ओढ व प्रेरणा निर्माण व्हावी, तसेच विद्यार्थ्यांना आयुष्यात वाचनाचे महत्त्व पटावे, त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती वाढावी, यादृष्टीने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

# अटारी आंतरराष्ट्रीय सीमेजवळ घुसखोरीचा प्रयत्न

**श्रीनगर :** अटारी आंतरराष्ट्रीय सीमेजवळ भारतीय हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानी नागरिकाला सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) ताब्यात घेतले आहे. बीएसएफने या व्यक्तीला थांबण्याच्या सूचना दिल्या. मात्र, सूचनांकडे दुर्लक्ष करत या व्यक्तीने घुसखोरीचा प्रयत्न केला. यानंतर बीएसएफने त्याला ताब्यात घेतले.

बॉर्डर आउटपोस्ट पुलमोरान कंजरी येथील कुंपणाजवळ तारेच्या कुंपणाजवळ कर्तव्यावर असताना बीएसएफच्या १०० व्या बटालियनच्या जवानांना संशयास्पद हालचाली दिसल्या. एक पाकिस्तानी नागरिक तारेच्या कुंपणातून भारतात घुसखोरीचा प्रयत्न करत होता. बीएसएफच्या जवानांनी त्याला थांबण्याचा सूचना केल्या. मात्र त्याने दुर्लक्ष केले. अखेर जवानांनी घेराव घालून त्याला ताब्यात घेतले. या घटनेमुळे पंजाब सीमेवरील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मोहम्मद अवैस असे ताब्यात घेतलेल्या पाकिस्तानी नागरिकाचे नाव आहे. तो पाकिस्तानमधील फैसलाबाद जिल्ह्यातील मुंडा पिंड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बाथ गावाचा रहिवासी आहे. घटनेनंतर वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर पुढील तपासासाठी त्या व्यक्तीला घरींदा पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. पोलीस कथित घुसखोरी आणि त्यामागाचा हेतू जाणून घेण्यासाठी त्याची चौकशी करत आहेत.